शनिवार, ११ नोव्हेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ९५
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 11 NOV. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-95 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-10 ●PRICE-5




# जायकवाडीत पाणी सोडा: शेतकऱ्यांचा रास्ता रोको

आधुनिक केसरी न्यूज

दादासाहेब घोडके

**पैठण :** जायकवाडी धरणात पाणी सोडावे, पैठण तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा व पिक विमा मंजूर करावा या प्रमुख मागणीसाठी शुक्रवार दिनांक १० नोव्हेंबर रोजी पैठणचे माजी नगराध्यक्ष दत्ताभाऊ गोरडे यांच्या नेतृत्वाखाली पैठण येथे शेतकऱ्यांनी एक तास रास्ता रोको आंदोलन केले. या मागण्यांची अंमलबजावणी करावी यासाठी पैठणच्या सह्याद्री हॉटेल चौकामध्ये शुक्रवार रोजी सकाळी ११.०० वाजेपासून रास्ता रोको करण्यात आला.

समन्यायी पाणी वाटप धोरणानुसार वरील धरणातून जायकवाडी धरणात पाणी सोडावे, पैठण तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा, ब्रह्मगव्हाण जलसिंचन उपसा योजनेतून खेर्डा प्रकल्पात पाणी सोडावे, आपेगाव हिरडपुरी बंधाऱ्यात जायकवाडीतून पाणी सोडावे, यंदाच्या पावसाळ्यात मोठा खंड पडल्याने पीक विमा लागू करावा व धरणाच्या उजव्या डाव्या कालव्यातून किमान चार आवर्तन पाणी सोडावे या प्रमुख शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात दत्ताभाऊ गोरडे, पीआर थोटे, सचिन घायाळ, आबा मोरे, बद्रीनारायण भुमरे, सुरेश दुबाले, भाऊसाहेब पिसे, राजू बोबडे, अप्पा गायकवाड, महादेव ठोके, दिनेश पारिक, चंद्रकांत झारगड, राजू बोबडे, प्रल्हाद तात्या औटे, संजय सदावर्ते, शिवाजी लांडगे, महेश पिसे, असलम शेख, हरून बागवान, गोपी नाना गोरडे, अनिल घोडके, राजू नवथर, सुदाम शिंदे, उद्धव मापारी, राजू निवारे, शुभम गायकवाड, निलेश चव्हाण, दीपक हजारे, भगवान कबाड्डी, ज्ञानेश्वर उघडे, कैलास मापारी, लक्ष्मण इरतकर, राजेंद्र खरात, ऋषिकेश उगले, सुधीर रावस, हर्षवर्धन गिरगे, रामेश्वर भावले, परमेश्वर खरात, आकाश रावस, गोविंद बांगरे, संजय कोरडे, आप्पासाहेब गिरगे, कल्याण पठाडे, निसार पठाण आदी शेतकऱ्यांनी सहभाग घेतला होता.


## ‘लष्कर’च्या माजी कमांडरची अज्ञातांकडून हत्या

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारताचा एक मोठा शत्रू पाकिस्तानात मारला गेला आहे. लष्कर-ए-तैयबाचा माजी कमांडर अकरम खान उर्फ अकरम गाझी याची गोळ्या घालून हत्या करण्यात आली आहे. अकरम हा सातत्याने भारताविरोधात प्रक्षोभक भाषणं करायचा. २०१८ ते २०२० या तीन वर्षांच्या काळात तो लष्करमध्ये तरुणांना भरती करण्याचं काम करत होता. अकरम गाझी याला गुरुवारी बाजौर भागात हल्लेखोरांनी गोळ्या घालून हत्या केली आहे. गाझीवर गोळ्या झाडून हल्लेखोर तिथून पळून गेले अकरम हा लष्करच्या काही वरिष्ठ कमांडर्सपैकी एक होता. अनेक वर्ष तो दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी होता.










विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

वर्षभर ज्या सणाची आपण आतुरतेने वाट पाहत असतो तो आपला सर्वात महत्वाचा सण म्हणजे दिवाळी किंवा दीपावली. या सणाच्या निमित्ताने खूप काही गोष्टी आपण मनात ठरवलेल्या असतात. वर्षभरात आपल्याला एखादी वस्तू हवी असते. ही वस्तू म्हणजेच एखादी अतिउपयोगी, अतिमौल्यवान अशी गोष्ट असते, जी वर्षभरात केव्हाही घेता येत नाही. मग आपण ठरवतो की या दिवाळीला आपण अमुक एक वस्तू घेऊ या. मग ते नवीन वाहन असेल, जागेची खरेदी असेल, एखादा दागिना, नवीन कपडे असतील वा अन्य काही. दिवाळीच्या सुमुहूर्तावर आपण अशा प्रकारची खरेदी करतो. या निमित्ताने बाजारातही कोट्यवधींची उलाढाल होते. आर्थिक व्यवहारांना चालना मिळते. याच काळात छोटे छोटे व्यावसायिक सुद्धा आपली आर्थिक प्रगती करू शकतात. समाजातील काही घटक वर्षभर तसे उपेक्षित राहिलेले असतात. त्यांच्याही पदरात हा सण दोन पैसे टाकतो. पणत्या, घडे बनवणारा कुंभार, केरसुणी बनवणारे कारागीर, पादत्राणे बनवणारे गावाकडील चर्मकार, हॉटेल व्यावसायिक, हलवाई इ सर्वानाच यानिमित्ताने काम मिळते. त्याचबरोबर साफसफाई करणारे कामगार, रंग देणारे कारागीर यांनाही काम मिळते. एकूणच समाजातील सर्वच घटकांच्या आशा पल्लवित करणारा हा सण आहे. याच सणाच्या निमित्ताने वर्षभरात ज्यांना आपल्याकडे यायला जमले नाही असे नातेवाईक, पाहुणे, आप्तस्वकीय आपल्याकडे येतात. प्रियजनांच्या भेटीगाठी होतात. म्हणूनही आपण दिवाळीची वाट पाहत असतो. वर्षभर तर सगळे आपापल्या कामात व्यस्त असतात. या निमित्ताने चार दिवस एकत्र येऊन गप्पागोष्टी, फराळाचा, मिष्टान्नाचा आस्वाद घेतात. एक नवीन ऊर्जा, आनंद घेऊन आपापल्या घरी परततात. तसे पाहिले तर दिवाळीचे चार दिवस हे वर्षातल्या इतर दिवसांसारखेच असतात पण आपण त्यांच्याकडे कोणत्या दृष्टीने पाहतो, त्यावर त्यांचे वेगळेपण अवलंबून असते.



## आनंदी पहाट

## समाधान हे अंतरंगाद्वारे प्राप्त होते

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अंतरात्म्याला शांती मिळणं अत्यंत जरुरीचं असतं. आपल्या दैनंदिन गरजा भागवताना आपण केवळ शरीराचाच विचार करत असतो. अन्न, वस्त्र, निवारा ह्या तीनही गरजा खरं तर आपल्या शरीरासाठी आवश्यक असतात. आपल्याला त्याव्यतिरिक्त आणखीन एका गोष्टीची गरज असते, ती म्हणजे शांतीची. आपल्या अंतर्मनाला, अंतरात्म्याला शांती मिळणं मानसिक स्वास्थ्यासाठी अत्यंत आवश्यक असते. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या धावपळीत आपण आपली मुलभूत गरजच विसरून जातो, त्याची जाणीवच आपल्याला होत नाही. आपल्या जीवनांतील सार शोधण्यासाठी आपल्या अंतरात्म्याचा शोध घेण्याची, त्याला समजून घेण्याची, त्याचा यथायोग्य विचार करण्याची जरुरी असल्याची आपल्याला जाणीव असलीच पाहिजे. सुखाचा संबंध अनेकदा शरीराशी जोडला जात असतो. सुखद अनुभवांची आश्वासकता ही मनाला देखील जरुरीची असतेच. परंतू शारीरिक पातळीवर सुखी होण्याची केविलवाणी धडपड आपण दिवसरात्र करत असतो. आपल्या प्रत्येक विचार, वर्तन आणि व्यवहारांत आपण सुख मिळवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत असतो. आपल्याला अपेक्षित सुख मिळेपर्यंत आपली धडपड सुरुच असते. सुखामध्ये देखील आपल्यापैकी अनेकजण शरीरसुख हेच सर्वोच्च सुख असल्याच्या भ्रमांत आणि संभ्रमांत असतात. त्याही सुखांत शरीरापेक्षा मनाचा सहभागच अधिक असतो ह्याची त्यांना जाणीव होत नाही. मिळेल त्यांत समाधानी राहावं असं म्हंटलं जातं. समाधानाचा संबंध थेट आपल्या अंतर्मनाशी असतो. त्यामुळे आपल्या अंतर्मनाला जोपर्यंत समाधान मिळत नाही, तो पर्यंत आपण मानसिक पातळीवर स्वास्थ्य मिळवू शकत नसतो. आपण करत असलेल्या सर्वच गोष्टी आपल्याला नेहमीच समाधान मिळवून देतातच असं नाही. आपण करत असलेल्या गोष्टींमध्येच आपण समाधान शोधत असतो.



आधुनिक केसरी

## दाखवली खूण || चैतन्याची ||

नको भावनांची | घालमेल आता ||
तूचि भगवंता | सत्य एक ||१||
तुझ्या सत्ते चाले | कालचक्र सारे ||
काय म्या पामरे | वर्णू तुज? ||२||
संसाराची माया | सुटता सुटेना ||
म्हणूनी लागेना | ठाव तुझा ||३||
कर्माच्या संगती | पाप-पुण्य चाले ||
ज्याने ओळखले | तोचि संत ||४||
संतचरणाशी | जाता मी शरण ||
दाखवली खूण | चैतन्याची ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरूपण

आधुनिक केसरी

कुरूप अथवा कुलक्षण ।सकळांहूनि करंटेपण ।
तरी नाहीं तीसमान ।भूमंडळीं कोणी ॥१३॥
ऐसें तें केविलवाणें ।मातेविण दिसे उणें ।
रागें परतें केलें तिनें ।तरी आक्रंदोनी मिठी घाली ॥१४॥
सुख पावे मातेजवळी ।दुरी करितांचि तळमळी ।
अतिप्रीति तयेकाळीं ।मातेवरी लागली ॥१५॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

शरद ताप शशि से टले, कलुष सन्त से जाय ।
पुण्य पुञ्ज के उदय में, सन्त समागम पाय
।।१८।।(स्वर्वेद तृतीय मण्डल अष्टम अध्याय) ०३/०८/१८
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
शरदाची काहिली (शरद ऋतूतील उष्मा) चंद्राने दूर होते त्याच प्रमाणे संत-दर्शनाने पापाचा क्षय होतो आणि पुर्वसुकृताच्या (पुण्यपुंज) उदयाने सन्त-समागम प्राप्त होतो. संत-दर्शनाची अत्यंत महिमा आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## शुन्यत्वनिरसन

आधुनिक केसरी

शुन्यत्वनिरसन या समासाचा अभ्यास करत असताना भगवंत व भक्त यांच्यातील संवाद लक्षात येतो. मित्रांनो आपण सर्व जण प्रापंचिक माणसं आहोत. प्रापंचिक गरजा पूर्ण करणे व त्या करत असताना सतत भगवंताचे नामस्मरण करत रहाणे. धर्माच्या चौकटीत राहून कर्म करतो तो खरा. कोणी म्हणतात भगवंत भक्ति करावी म्हणजे तो चांगली गति देतो,तर कर्म करण्याने ब्रम्हप्राप्ति होते. भोग भोगल्या खेरीज सुटका नाही. असेही तत्वज्ञान सांगतात. जन्ममरण हे शाश्वत सत्य आहे त्यामुळे सतत सत्कर्म करत रहावे की पुढच्या जन्मात तरी काही वाईट होणार नाही. अज्ञानातून प्रश्न निर्माण होतात.जो पर्यंत आपले अज्ञान दूर होत नाही तोपर्यंत प्रश्न उत्तरांचा खेळ चालतं रहाणार. जे जे दिसत आहे ते ते सत्य समजावे. पण अज्ञानातून आपण सत्य सुध्दा असत्य समजतो, यासाठी ज्ञानवंत होणे गरजेचे आहे. ब्रम्हाचे वर्णन करण्यासाठी वेद शास्त्र सुध्दा थकतात.मौन धरतात. बोलणे थांबवावे लागते. मन,ब्रम्ह,वाणी यांच्या कक्षे बाहेर आहे ते मनाच्या कक्षेमध्ये म्हणजे अनुभवाच्या आवाक्यामध्ये येणे शक्य नाही. पण ब्रम्ह आहे आणि कसे आहे असा निश्चय कोणी केला? कारण सिध्दांत प्रमाणे




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## प्रपंचातले सुख-दुःख हे केवळ जाणिवेत आहे

आधुनिक केसरी

प्रापंचिकाच्या मनात नेहमी एक शंका येते की, खोटे करूनसुद्धा जर सुखी होता येते तर तसे करायला काय हरकत आहे ? सन्मार्गाने गेला तरी माणूस दुःखी का होतो, अशीही शंका आपल्याला येते. मी देवाला भिऊन वागलो, का, तर प्रपंच सुखाचा व्हावा म्हणून. देवाची एवढी खटपट करूनही जर सुखी होता येत नाही तर काय उपयोग ? किती विचित्र आहे पाहा, खेळातले घर बांधायला आपण गवंडी बोलावण्यासारखा हा प्रकार आहे ! प्रपंचात दक्षता ठेवणे जरूर आहे; ते जर आपण केले नाही तर देवाने काय करावे ? भगवंताचा 'साधन' म्हणून आपण उपयोग करतो, आणि शेवटी साधनालाच दोष देतो, साध्य बाजूलाच राहते. भगवंत विषय देईल, पण त्याबरोबर त्याचे दुःखही देईल. एकजण मारुतिरायाला सांगून चोरी करीत असतो. तो एकदा पकडला गेला आणि त्याला शिक्षाही झाली; तेव्हा तीही मारुतीच्या संमतीनेच झाली असे नाही का ? 'मी कोण' हे जोवर आपण ओळखत नाही तोवर, वैभवाच्या शिखरावर जरी गेलो तरी आपल्याला समाधान मिळणार नाही.




ज्याच्यापासून प्रपंच झाला, त्याला ओळखता आले पाहिजे. देहच सत्य नाही तर त्यावर उभारलेली इमारत कुठून सत्य असणार ? ठिगळे लावून आपण आपला प्रपंच करतो; मग त्यात कमतरता आल्याशिवाय नाही राहात ! कोळसा उगाळून पांढरा रंग मिळेल हे म्हणणे जसे वेडेपणाचे आहे, तसे प्रपंचात सुख मिळवीन हे म्हणणे आहे. सुखदुःख हे जाणिवेत आहे. आपल्याला मिळायचे तेवढेच मिळते, पण आपले हवे-नकोपण, म्हणजे आपली वासना, गेली की सुखदुःख राहात नाही. वासना मारायला, भगवंताचे अधिष्ठान हाच एक उपाय आहे. वासना ही लाडावलेल्या कुत्र्याप्रमाणे आहे, तिला नुसते हड्हड् करून ती बाजूला जात नाही. पण तेही बरोबरच आहे, कारण आपणच तिला लाडावून ठेवले आहे, म्हणून भगवंताच्या पूजेच्या वेळीसुद्धा ती देवघरात येते. शिवाय, वाईट वासनेमध्ये चांगल्या वासनेला मारण्याचे बळ आहे, कारण आपण स्वतः वाईट वासनेच्या बाजूचेच आहोत ! वासना ही कोणत्याही उपायांनी तृप्त होण्यासारखी नसून, आपण जर भगवंताजवळ 'वास' ठेवला तरच ती नष्ट होते. 'मी कर्ता नसून परमात्मा कर्ता आहे' अशी भावना झाल्याशिवाय मन भगवंताला अर्पण होणार नाही; ते अर्पण झाल्याशिवाय फळाची अपेक्षा सुटणार नाही; आणि फळाची अपेक्षा सुटल्याशिवाय जीवाला शांती मिळणार नाही.

## समर्थ रामदास

आधुनिक केसरी

सद्वस्तूंच्या ठिकाणी "मी अनुभव घेतो" असे द्वैत नसते.जेथे द्वैत नसते तेथे अनुभव निर्माण होऊ शकत नाही. प्रत्येकाचे अनुभव वेगवेगळे असतात. सगळ्यांचे अनुभव जसे एक करता येत नाहीत. कारण एक साक्षीत्वाने वागतो साक्षी वेगळा आहे असे म्हणतो आपण द्रष्टा आहोत, असे दुसरा कोणी म्हणतो केवळ पाहणारे साक्षी आहोत,हे सर्व आपण अनुभवत असतो फक्त आपला दृष्टिकोन साक्षीत्वाकडे सकारात्मक ठेवून पहावयास हवे. दृष्याहून द्रष्टा वेगळा आहे असा अनुभव स्थिर झाला म्हणजे दृष्यात राहून त्यापासून अलिप्त असण्याची कला साधता येते..



आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, ११ नोव्हेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# पोल शिफ्टिंगच्या कामाचा देखावा

## भोकर महावितरणमधील प्रकार : वरिष्ठांचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** येथील महावितरण कंपणीत अनेक कामात गैरव्यवहाराची "श्रृंखला" सूरू असतानाच नांदेड भोकर रोडवर तेलंगाना सीमेपर्यंत महामार्ग रस्त्यावर "पोल शिफ्टिंग" ची कामे अंदाज पत्रकास बगल देऊन देखावा केला जात आहेत. वरिष्ठ अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत आहेत.

येथील महावितरण कार्यालयाचे तत्कालीन कार्यकारी अभियंता चितळे यांच्या विरुद्ध अनेक तक्रारी होत्या. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. डीपी बसविणे, डीपीची दुरुस्ती करणे,तार ओढणे, पोल बसविणे अशा विविध प्रकारची कामे बोगस रीत्या करून कार्यकारी अभियंत्यांनी अनागोंदी कारभार केला होता. प्रचंड प्रमाणात अधीक्षक अभियंता कार्यालयापर्यंत तक्रार झाली पण कंत्राट दारावर कुठलीच कारवाई झाली नाही.



**पोल शिफ्टिंगची कामे निकृष्ट :** नांदेड भोकर राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावर भोकर फाट्यापासून ते तेलंगाना सीमेपर्यंत नवीन पोल शिफ्टिंग चे काम एका गुत्तेदारास देण्यात आले असून अतिशय हलक्या दर्जाचे काम उरकण्यात केली जात आहेत . पोलचा खड्डा सात फुटांपर्यंत तर त्यावरील दोन फूट सिमेंट कॉंक्रेट करणे गरजेचे आहे पोल दर्जाचा, वायर देखील चांगल्या प्रकारचा असावा अंदाज पत्रकास बगल देऊन नियमांकडे कंत्राटदारांनी दुर्लक्ष केले आहे . खोद कामांमध्ये केवळ दगड माती वापरून खड्डा बुजविला व त्यावर नाम मात्र सिमेंटचे बांधकाम केले . खांबाला पालीस मारून देखावा करण्यात आला . ताराची गेज देखील कमी प्रकारची आहे . हलक्या दर्जाचे काम उरकून लाखोंची देयके काढण्यात येत आहेत . राष्ट्रीय महामार्गावर अशा प्रकारची होणारी कामे भविष्यात धोकादायक ठरू शकतात . विशेषता वाहनांना धोका होऊ शकतो . सदरील कामाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कार्यवाही करण्यात यावी अशी नागरिकांची मागणी आहे .




# शेतकऱ्यांच्या समस्या दूर करा; अन्यथा तीव्र आंदोलन छेडू : डॉ. गोपाल बछिरे

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** शेतकऱ्यांच्या दुष्काळी निधी अतिवृष्टीमदत कृषी विभाग अनुदान व वीजेची समस्या सोडवा अन्यथा तीव्र आंदोलन छेडू असा इशारा शिवसेना उबाठाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे यांनी तहसीलदारांना दिला.

लोणार तालुक्यात दुष्काळाचे अनुदान अद्याप सर्व शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेले नाही त्यातील त्रुटी दूर करून ते त्वरित देण्यात यावे. पीक विम्याची नुकसान भरपाई विना कंपनीने अद्याप शेतकऱ्यांना दिलेली नाही जी दिली ती तुटपुंजी आहे. पूर्ण पीक विमा शेतकऱ्यास देण्यात यावा शेतकऱ्यांच्या बँक खात्यांवर जो होल्ड लावण्यात आलेले आहे ते खुले करण्याचा आदेश लोणार तालुक्यातील सर्व बँकांना पारित करावे.अतिवृष्टीची आर्थिक मदत अद्याप ५०% शेतकऱ्यांना मिळालेली नाही ती सर्व शेतकऱ्यांना देण्यात यावी.ट्रॅक्टर अथवा दुसऱ्या कारणासाठी शेतकऱ्यास कृषी विभागाकडून मिळणारी सबसिडी गत दोन वर्षात दिलेली नाही ते त्वरित देण्याचे आदेश कृषी विभागास देण्यात यावे.वन्यप्राणी उदाहरणार्थ रोही, जंगली डुकरे, हरीण यांच्याकडून झालेल्या पिकांची नुकसान भरपाई त्वरित देऊन वन्य प्राण्यांच्या त्रासापासून शेतकऱ्यांची सुटका करण्यात उपाय योजना कराव्यात.शेतकऱ्यास विनाखंड अखंडपणे आठ तास शेतीसाठी वीजपुरवठा होणे अनिवार्य आहे परंतु वीज कंपनी शारा,वेणी,सुलतानपूर, पांग्र, रायगाव, हिरडव, धायफळ, चिंचोली विभागात २ ते ६ तसाच वीज पुरवठा होतो पूर्ण ८ तास वीज देण्यासाठी वीज वितरण कंपनीस आदेश देण्यात यावा. उपरोक्त शेतकरी राजा यांच्या संबंधित या समस्यांचे समाधान तातडीने करण्यात यावे अन्यथा शासन व प्रशासन यांच्या निषेधार्थ (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष) व महाविकास आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडू असा इशारा डॉ. बाच्छिरे यांनी प्रशासनास दिला. याप्रसंगी एड.दीपक मापारी, गजानन जाधव सर, किसनराव आघाव, किरण कमडे सह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.



कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था (CSMSS) येथे मराठवाडा शिक्षक मतदारसंघ आमदार श्री. विक्रम वसंतराव काळे आणि छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विकास मिना यांनी जिल्हा परिषदेच्या कार्यक्रमानिमित्त सदिच्छा भेट दिली, यावेळी त्यांचा सत्कार संस्थेचे सचिव श्री. पद्माकरकाका मुळे यांनी केला. यावेळी शिक्षण उपसंचालक मा. अनिल साबळे, शिक्षणाधिकारी मा. एम. के. देशमुख, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे, प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे, मानव संसाधन अधिकारी श्री. अशोक आहेर आणि जनसंपर्क अधिकारी संजय अंबादास पाटील उपस्थित होते.






## मानवजातीला हाय अलर्ट!

आधुनिक केसरी

गेल्या अनेक वर्षांपासून जागतिक तापमानवाढीवर निरनिराळ्या स्तरातून चिंता व्यक्त केली जात आहे. संयुक्त राष्ट्रांपासून अनेक आंतरराष्ट्रीय संघटना, देशोदेशीच्या पर्यावरणप्रेम संघटना व पर्यावरणतज्ज्ञ यावर सातत्याने भूमिका मांडत आहेत. मात्र, तरीही जागतिक पातळीवर पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार अत्यंत कमी लोकसंख्येकडून करण्यात आला आहे. त्यामुळे जागतिक तापमानवाढीचे चटके वेगवेगळ्या देशांमध्ये वेगवेगळ्या प्रमाणात बसू लागले आहेत. आता यासंदर्भात अवघ्या मानवजातीला धोक्याची घंटा ठरणारा एक अहवाल समोर आला असून त्यानुसार गेले १२ महिने हे पृथ्वीतलावर नोंद करण्यात आलेले सर्वात उष्ण १२ महिने होते! 'क्लायमेट रीसर्च' या समाजसेवी विज्ञान संशोधन संस्थेकडून करण्यात आलेल्या अभ्यासातून हे निष्कर्ष मांडण्यात आले आहेत. यानुसार, नोव्हेंबर २०२२ ते ऑक्टोबर २०२३ हा कालखंड पृथ्वीतलावर नोंद करण्यात आलेल्या तापमानातील सर्वात उष्ण तापमानाचा काळ होता. कोळसा, नैसर्गिक वायू, इतर इंधनाच्या ज्वलनामुळे पृथ्वीचे तापमान वाढवणारे कार्बनडाय ऑक्साईडसारखे वायू बाहेर पडत आहेत. त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढू लागले आहे. हिंदुस्तान टाईम्सने यासंदर्भातले वृत्त दिले आहे. या वर्षभरात पृथ्वीवरील जवळपास ७.३ बिलियन अर्थात ९० टक्के लोकसंख्येला किमान १० दिवस अतीउष्ण दिवसांचा अनुभव आला. हे प्रमाण सामान्य तापमानापेक्षा तप्पल तीन पट अधिक असल्याचीही नोंद झाली. या काळात सरासरी जागतिक तापमान १.३ अंश सेल्सिअस नोंद झाले. पॅरिस करारानुसार जागतिक स्तरावर सगळ्यांनीच मान्य केलेल्या १.५ अंश सेल्सिअस मर्यादेच्या हे अगदी जवळ पोहोचल्याचे दिसत आहे. लोकांना हे माहिती आहे की गोष्टी फार विचित्र झाल्या आहेत. पण त्या का विचित्र झाल्यात, हे मात्र लोकांना समजत नाहीये. कारण ते वास्तवाकडे बघत नाहीयेत. आपण अजूनही कोळसा, तेल आणि नैसर्गिक वायू जाळत आहोत, अशी प्रतिक्रिया क्लायमेट सेंट्रलचे वैज्ञानिक अँड्र्यू पर्शिंग यांनी दिली आहे. मला वाटते या वर्षी समोर आलेल्या आकडेवारीतून एक गोष्ट ठळकपणे समोर आली आहे. ती म्हणजे कुणीच सुरक्षित नाही प्रत्येकाला वर्षभरात कधी ना कधी असामान्य अशी उष्णता अनुभवायला मिळाली आहे, असेही पर्शिंग यांनी नमूद केले. हे म्हणजे आपण सरकत्या जिन्यावर उभे राहायचे आणि आश्चर्य व्यक्त करायचे की आपण वर कसे जात आहोत! सगळ्यांना कल्पना आहे की जागतिक तापमानवाढ होत आहे. गेल्या काही दशकांपासून त्याचे अंदाज वर्तवले जात आहेत, अशी प्रतिक्रिया कोलंबिया विद्यापीठातील हवामान तज्ज्ञ जेसन स्मरडॉन यांनी दिली.

## बहुजनांनो, सरकारने आरक्षण ठेवलेच कुठे ?

आधुनिक केसरी



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

**आज महाराष्ट्रामध्ये आरक्षणाच्या संदर्भात फार मोठ्या प्रमाणावर गदारोळ उठलेला आहे. आंदोलने करून, आमरण उपोषण करून, निवेदने देऊन आम्हाला आरक्षण भेटलेच पाहिजे अशा प्रकारची भूमिका महाराष्ट्रातील विविध जातीतील माणसे, संघटना घेताना दिसत आहेत. कुणी आम्हाला या गटात टाका कोणी आम्हाला त्या गटात टाका तर कोणी आम्हाला आरक्षणाचा वाटा मिळत नाही म्हणून आंदोलने,मोर्चे आणि आमरण उपोषण करत आहेत. त्याचबरोबर आरक्षणावरून एकमेकांच्या विरोधातही अनेक जण उभे टाकताना दिसत आहेत. वेगवेगळ्या जातीची मोर्चे निघत आहेत. आंदोलने करत आहेत.**

जाती जातीमध्ये, समाजा- समाजामध्ये, माणसा- माणसांमध्ये, गावा- गावामध्ये त्याचबरोबर विविध ठिकाणी मग सरकारी कार्यालये, खाजगी कार्यालये, शाळा,महाविद्यालये व इतर ठिकाणीही या आरक्षणावरून व मोर्चावरून विषमता, द्वेषभावना, तिरस्कार फार मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसत आहे. माणूस माणसापासून तुटत चालला आहे. माणसं एकमेकांच्या विरोधात वागताना बोलताना चालताना दिसत आहेत. त्याचबरोबर सोशल मीडियावर ही अनेक जण वेगवेगळ्या प्रकारची नको ती गरळ ओकताना दिसत आहेत. त्यामुळे जाती जातीवर, माणसा माणसावर, जातीतल्या संस्कृतीवर टीका केली जात आहे. तर अनेकजण आरक्षणाच्या नावावर प्रचंड मोठ्या प्रमाणावर सामाजिक क्षेत्रातील,राजकीय क्षेत्रातील माणसे राजकारणही करताना दिसत आहेत. स्वतःची स्वार्थाची पोळी भाजून घेताना दिसत आहेत. सर्वसामान्य माणूस अस्वस्थ, अस्थिर आहे, हतबलपण झाला आहे. काय करावे आणि काय करू नये हे त्याला कळेनासे झाले आहे. अनेकजण तर आशा या वातावरणात गुदमरत आहेत तर काहीजण गुदमरून मरून जात आहे. हे वातावरण एकंदरीत महाराष्ट्रासाठी आणि देशहितासाठी घातक आहे. खरे तर या सगळ्या प्रश्नांसाठी ज्यांना आम्ही निवडून दिले आहे. ते लोकप्रतिनिधी म्हणजे सरकारही योग्य अशा प्रकारचा तोडगा यावर काढताना दिसत नाहीत. उलट असे भिजत घोंगडे ठेवून त्यावर ते राजकारण करताना दिसत आहेत. याबाबतची खरी परिस्थिती काय आहे, संविधानिक बाबी काय आहेत ते सरकारने जनतेच्या समोर अगदी सडेतोडपणे आणि खरे मांडणे गरजेचे आहे. परंतु तसे होताना दिसत नाही म्हणूनच या देशाची परिस्थिती अस्वस्थ, अस्थिर आणि असहिष्णू झाली आहे. एकीकडे आम्हाला आरक्षण मिळायला हवे त्यामुळे आमच्या मुलांना त्याचा फायदा होईल, त्यांचे जीवन चांगले जाईल. अशी भावना आहे तर दुसरीकडे ज्यांना आरक्षण मिळते आहे त्यांनाही खऱ्या अर्थाने म्हणावा तेवढा या आरक्षणाचा फायदा दिला गेला नाही. दलित, आदिवासी, ओबीसी,भटके विमुक्त,पालावरचे अनेक जण वंचित आहेत. अनेक महत्त्वाच्या, मोक्याच्या जागा ह्या तशाच आजही रिकाम्या आहेत. त्या जाणून बुजून जातीय द्वेषातून भरल्या जात नाहीत. अजूनही आरक्षण मिळणाऱ्या मधल्या काही जाती या आरक्षणापासून खूप वंचित आहेत,कोसो दूर आहेत. त्यांना अजूनही आरक्षणाचा काय उपयोग असतो काय फायदा असतो हेही माहीत नाही. अनेकांचे पोट हे हातावरचे आहे. त्यांनी दिवसभर काम केले तरच संध्याकाळी त्यांना खायला मिळते आहे. त्यांच्यापर्यंत आरक्षणाचा अजून हा उजेड गेलेला नाही. त्यातच हे असे वातावरण झाले आहे. जे काही थोडे फार बोटावर मोजण्याइतके आरक्षणामुळे सुधारले आहेत, प्रगतीपथावर गेले आहेत त्यांच्याबद्दलही अनेकांच्या मनात असूया निर्माण होताना दिसत आहे. जे आरक्षणामुळे शिकले, सुधारले, प्रगतीपथावर गेले परंतु त्यांना मात्र समाजामध्ये आजही प्रतिष्ठेपासून दूर ठेवले जाते आहे. त्यांच्या पदोन्नत्या रोखणे, आर्थिक शोषण करणे हे चालूच आहे. त्यांच्याकडे आजही जातीय धर्मीय भावनेतूनच पाहिले जाते आहे. ही वस्तुस्थिती नाकारता येण्यासारखी नाही. हे चित्र सारे असे असताना आरक्षणासाठी मोर्चे, आंदोलने आणि आमरण उपोषण होत असताना सरकार मात्र खाजगीकरणाचा सपाटा प्रचंड मोठ्या प्रमाणावर लावत आहे.नोकर भरती बंद करत आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून जवळजवळ पंधरा वर्षापासून नोकर भरती बंद आहे. आता तर कंत्राटीपद्धत मोठ्या प्रमाणावर येत आहे. अग्निवीर योजना आली आहे. आरक्षणावरही विविध प्रकारच्या माध्यमातून प्रहार करताना दिसत आहेत.दिल्लीत संविधान जाळले जात आहे. सरकारच्या यंत्रणेमध्येही ब्राह्मणवाद फार मोठ्या प्रमाणावर दिसून येतो आहे. आज विविध प्रकारच्या जाहिराती येतात त्या जाहिरातीतील जागा कोणत्या जातीला आहेत त्या अजिबात कळत नाही.तशी त्याची व्युहरचना ब्राम्हणवादी यंत्रणा अगदी पोटातील पाणी हलू न देता आखत आहे. त्यामुळेच त्यांनी शासकीय यंत्रणा सगळी खिळखिळी करून टाकलेली दिसत आहे. कुणावरही नियंत्रण ठेवताना दिसत नाहीत. त्यामुळे नोकरीची हमी मिळेलच याची शाश्वती नाही.या सगळ्या गोष्टीकडे मात्र या देशातील जनतेचे लक्ष अजिबातच दिसत नाही. सरकारही याबाबतीत प्रचंड उदासीन आहे. या देशातील जनतेची प्रगती व्हावी, शिक्षण घेऊन त्यांनी प्रगती करावी असे सरकारलाही अजिबात वाटताना दिसत नाही. उलट या सर्व लोकांच्या जीवनात विविध प्रकारच्या पातळीवर गतिरोधक कसे निर्माण करता येतील याची आखणी मात्र ते सतत करताना दिसत आहेत. आज शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करतो आहे, शिकलेल्यांना नोकऱ्या नाहीत, महागाई प्रचंड वाढली आहे, जातीय धर्मीय तेढ समाजात समाजामध्ये निर्माण होत आहे, शाळेचे खाजगीकरण होत आहे, एमपीएससी यूपीएससी सारख्या जागा दारामागून म्हणजे परीक्षाविना भरल्या जात आहेत, ड्रग्सचे कारखाने फोपावत आहेत, तरुणाई त्यामध्ये झिंगत आहे तरीही या सरकारचे लक्ष नाही. याचा अर्थ काय समजावा? आज नोकर भरतीच्या संदर्भातील शासनाच्या विविध जाहिराती प्रसिद्ध केल्या जात आहे. त्या जाहिरातीच्या समोर जातीचा उल्लेख केला जात नाही. जाहिराती मोघम दिल्या जात आहेत. नोकर भरतीचे कॉन्ट्रॅक्ट खाजगी कंपनीला दिली आहे. नोकरीतील जागा कमी केल्या आहेत. अनेक शिष्यवृत्ती बंद करणे चालू आहे. कोरोना काळात अनेक गरिबांच्या नोकऱ्या गेले आहेत. कंपन्या बंद पाडल्या आहेत. एकंदरीत ही व्यवस्थाच मोडकळीस आणणे चालू आहे. त्यामुळे संभ्रमावस्था निर्माण होते आहे. अनेक ठिकाणी मुलाखती घेतल्या तर सिलेक्शन कसे केले जाते ते कुणालाही कळत नाही. गोंडवाना व इतर ठिकाणच्या विद्यापीठाच्या व इतर क्षेत्रातीलही बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. गुणवत्तेचा फक्त बाऊ केला जात आहे. त्याचबरोबर काही जागेसाठी परीक्षा घेतल्या जात आहेत तर त्याचे पेपरही अगोदरच बहुतांशी करून नियोजन पद्धतीने फोडले जातात की काय? सगळीकडून असे फासे टाकले जात आहे. त्यात कटकारस्थान करून बहुजन समाजाला अडकवून टाकले जाते आहे. त्यामुळे अशा जागा भरणे ही तसेच राहून जाते. ज्या आरक्षणासाठी आज लढाया होताना दिसतात त्या आरक्षणाचा उपयोग सद्यस्थितीत काय? हा प्रश्न सर्वसामान्य माणसांनाच नव्हे तर सर्व देशाला पडणार आहे.पडला पाहिजे. परंतु या प्रश्नाकडे अनेकांचे लक्ष जाऊ नये म्हणून अनेकांना हिंदुत्वात, धर्मात, जातीत अडकवून पद्धतशीरपणे बहुजनांचा काटा काढला जात आहे. भारतीय संविधानाची मोडतोड केली जात आहे. आज अनेक शाळा बंद पाडल्या आहेत. शाळा बंद पडल्या तर नोकरीसाठी आरक्षण कुठे राहणार? कंत्राटी पद्धती त आरक्षण नाही. बहुजनांची मुले शिकु नाहीत म्हणून त्यामध्ये शिक्षक भरती केली जात नाही. नवीन शैक्षणिक धोरणाने तर सर्वसामान्यांच्या तरुणांचे जीवन उद्ध्वस्त होणार आहे. तरीही हिंदू शांतच आहे. त्याविरुद्ध हिंदू चक्कार शब्दही बोलत नाही. त्याचा मेंदू सगळा हॅंग करून टाकला आहे.त्याला अनेक जण बळी पडून स्वतःच्या विकासाच्या वाटा स्वतःच बंद करून घेत आहेत. मग ज्या आरक्षणासाठी आम्ही लढतो आहोत किंवा ज्यांना आरक्षण दिले आहे त्या आरक्षणाचा फायदा अशा प्रकारच्या परिस्थितीत कोणाला होणार? सरकारमधील जात्यांध भारतीय संविधानाची मोडतोड करत आहेत. ज्या संविधानाने आरक्षण दिले आहे त्या संविधानाला ते बदलू पाहत आहेत. संविधानाची मूल्ये ते पायदळी तुडवत आहेत अन् बहुजनांना मात्र त्यांनी आरक्षणाच्या माध्यमातून झुंजवत ठेवले आहे. हा प्रश्न मात्र कोणाला सतावत नाही. त्याविरुद्ध कुणी आवाज उठवत नाही. आरक्षण अशा प्रकारच्या माध्यमातून संपवून टाकायला लागली आहेत तरी ब्र शब्दही निघत नाही. ही परिस्थिती या भारतातील सुशिक्षित लोकांची आहे. ज्या लोकांना आमदार,खासदार जनतेने जनतेची सेवा करण्यासाठी निवडून दिले आहे. ते लोकप्रतिनिधी ही डोळे झाकून दूध पिताना दिसत आहेत. तेही या संदर्भात काही बोलत नाहीत. आवाज उठवत नाहीत. वाचा फोडत नाहीत. तेही जनतेने मतदानाच्या वेळी लक्षात ठेवायलाच हवे. रात्र वैऱ्याची आहे. म्हणून आरक्षण धारकांनो जागा, खडबडून जागे व्हा, आपले हक्क, अधिकार कोणी हिरावून घेत आहे का? कोण फासे टाकत आहे हे वेळीच ओळखा अन्यथा येणाऱ्या काळात तुम्हाला भारतीय संविधानाने माणूस म्हणून दिलेली ओळख पुसली जाऊ शकते. त्या दृष्टीने ब्राह्मणवादी जोरात पावले उचलताना दिसत आहे.बहुजनांची सगळ्याच क्षेत्रातील बहुजनांचे दरवाजे बंद करणे चालू आहे. बहुजनच बहुजनाच्या विरोधात उभे केले जात आहेत. सावध रहा. जागे राहा.जागे व्हा. जे आरक्षण मिळाले आहे, मिळणार आहे ते वाचवण्याचा प्रयत्न करा अन्यथा मरण जवळ येत आहे हे समजा.

## सन्मान हा व्यक्तीचा नाही तर शक्तीचा होत असतो



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**दैनंदिन जीवनात नैसर्गिक न्याय तत्वां नुसार सन्मान होईल अशी शक्ती अर्जित करण्यासाठी जीवन असतं भौतिक इच्छा जीवनात निर्माण होणं स्वाभाविक असतं पण शाश्वत इच्छा मध्ये मान सन्मान अपमान सम असतो. भौतिक जीवनात सन्मान हा शक्तिचा होत असल्याने शक्ति हिच महत्वपूर्ण असते. व्यक्ति हा निमित्त मात्र असतो.आयुष्यात आपल्याला मान,सन्मान मिळावा हि प्रत्येकाची मनोमन इच्छा असते.पण खरंया अर्थाने विचार केला तर आयुष्यातील हा सन्मान आपल्याला आपण एक व्यक्ती आहेत म्हणून खरच मिळतो का? तर नक्कीच मिळत नाही. फक्त व्यक्ती म्हणून सन्मान मिळणं महाकठिण असतं. सन्मानाची भौतिक इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्याला शक्ति बळ अर्जित करावं लागेल.**

आपलं सामर्थ्य निर्माण करावं लागेल. त्यासाठी अहोरात्र प्रचंड मेहनत करून प्रसंगी वेळेसोबत कठिण संघर्ष करून आपल्याला मजबुतीने उभा राहव लागेल. आपल्या आयुष्यात आपलं बलस्थान निर्माण करावं लागेल. कारण सन्मान असो की पूजा ही सदैव बलस्थान शक्ति, पद, सत्ता याची होतं असते. व्यक्ति निमित्त मात्र असतो. व्यक्ति म्हणून सन्मान मिळत नाही त्याच प्रमाणे नुसत्या व्यक्तिची देखिल पूजा होण पण खुप कठिण आहे. महणुन आपल्या जीवनात आपण आपलं बलस्थान मजबूत केल पाहिजे.समाजिक पातळीवर सन्मानाचा निकष काय? तर शक्ति ताकद बळ, सामर्थ्य हेच सन्मानिय असतं पुजनिय असतं. बाकी व्यक्ती हा नाममात्र असतो. जोपर्यंत बळ तो पर्यंत सन्मान होतो. म्हणून व्यक्ति हा सन्माननीय नाही तर त्या व्यक्तीकड धारण अर्जित शक्ति दर्जा पद जोपर्यंत आहे तोपर्यंत लोक पुजा करतात सन्मान करतात पण पद संपुष्टात आलं दर्जा संपला कि लोक त्यांचं व्यक्तिकड पुर्ववत फिरकत पण नाहीत सन्मान तर दुरच हे वास्तव आहे.लोकांना आपल्याकडं किती ज्ञान विद्वत्ता गुणवत्ता आहे याशी फार काही देणंघेणं नसतं. म्हणजे लोकांचा आपल्या ज्ञान अज्ञानात फार रस अथवा स्वारस्य मुळीच नसत.आपण अर्जित केलेल्या शक्तिमध्ये शक्ति ही ताकद आहे शस्त्र अस्त्र सर्व काही आहे आपल्याकडे शक्ति नसेल तर आपण निरूपयोगी आहेत.जो चमत्कार दाखवेल त्याला नमस्कार करणार युग असल्याने शक्ति मिळवा. आपल्याकडं कोणत्याही प्रकारची शक्ति नसेल तर लोक आपल्याला नमस्कार घालायला पण दुर्लक्ष करतात आणि आपल्याकडं उच्चतम पद असेल तर किती हि वेळ लागला तरी लोक भेटण्यासाठी गर्दी करतात तसंच एका क्षणाच्या भेटीसाठी कित्येक तास वाट पाहत थांबतात हे आजच्या जगाच भयानक वास्तव आहे. म्हणून स्वतःला कमजोर समजु नका प्रयत्न करा मेहनत करा यश शक्ति अर्जित करा. लोक सन्मान करण्यासाठी लाईन लावतील पण आपलं अस्तित्व निर्माण झाल्याशिवाय सन्मान होणार नाही. म्हणजे सन्मान हा आपला नाही तर आपण अर्जित केलेल्या शक्तिचा होत असतो. म्हणून सन्मान मिळवुन देणारी शक्ति अर्जित करा. समाजात कोणत्याही व्यक्तिची पुजा होते सन्मान होतो तेव्हा लोक हा सन्मान हि पुजा व्यक्तिमत्त्व म्हणून करत नाहीत तर त्या व्यक्तीकड अर्जित केलेलं जे पद आहे शक्ति आहे त्याची पुजा करत असतात. शक्ति म्हणजे शारीरीक बळ नाही तर सामाजिक पातळीवरील सत्ता पावर हि शक्ती आपलं मुल्यमापन निश्चित करत असते. आपण आपल्या पेक्षा मोठ्या पदस्थ व्यक्तिची वाट पाहतो तर आपल्या पेक्षा कमी पदस्थ व्यक्तिला दुर्लक्षित करतो हा मानवी स्वभावाचा भाग आहे. याला अपवाद पण अनेक लोक असु शकतात. क्षेत्र कोणतही असु द्या त्या क्षेत्रातील उच्च शक्ति हिच पुजनीय ठरते. महणुन वेगवेगळ्या वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य करणारी जे काही शक्ति केंद्रीत व्यक्तिमत्त्व आहेत त्यांच्या मागे लोकांची रांग ही मुंग्या सारखी लागते पण हेच वलय अथवा बलस्थान नष्ट होताच लोक काढता पाय घेतात. हे अगदी कटु सत्य आहे. मानवी जीवनात व्यक्तिच मुल्यमापन होण गरजेच आहे. पण दुर्दैवाने असं होतं नाही. मानवी जीवनात जे काही अपेक्षित असतं त्या पासुन आपण कोसो दूर असतो आणि जे क्षणिक असत त्याच भोवती आपण फिरत असतो.मुळात जीवन हितार्थ काय आहे हे समजणं खुप गरजेचं आहे. प्रतिष्ठा सन्मान हि क्षणिक असते पण याची आपल्याला भुरळ पडते. आणि जीवनाच्या वास्तविक उद्देशापासून आपण दुर जातो.आणि इथंच आपली गडबड होते. आपण आपलं कार्य करताना अथवा यथा योग्य योगदान देताना इमानेइतबारे दिलं पाहिजे. बाकी मान, सन्मान अपमान हा काही महत्वाचा भाग नाही. आत्म्याचे हित काय आहे हे समजुन आपलं आत्महित कसं होईल हे समजलं पाहिजे आणि ते साध्य करण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत.हे शाश्वत जन्माच हित आहे पण भौतिक जीवनातील हित सन्मान अपेक्षीत असेल तर मग स्वतःला असं घडवा की तुमची शक्ति तहयात तुमच्याकडे टिकून राहिली पाहिजे आणि जगातील सर्वात उत्कृष्ट आणि श्रेष्ठ शक्ति अर्जित करण हे धेय्य असलं पाहिजे.आपली शक्ति हेच आपलं सामर्थ्य असतं याची जाणीव ठेवून मार्गक्रमण करत रहा यश नक्कीच मिळेल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# बल्लारपूर हत्याकांडातील आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्यातील बल्लारपूर शहरातील विद्यानगर वार्डातील शांतीनगर मधील एका युवकाला 6 तारखेला अमानुष मारहाण करत त्याचा पाच जणांना खून केला. तर एक जण गंभीर जखमी आहे. पोलिसांनी पाचही आरोपीना अटक केली. यात महिलांचा सुद्धा समावेश आहे. हे सर्व आरोपी गुंड प्रवृत्तीचे असून या आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी उलगुलान संघटनेने केली असून राजू झोडे यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी बल्लारपूर पोलिसांना निवेदन देण्यात आले आहे.



विद्यानगर वार्डातील शांतीनगर मध्ये राहणारे नगराळे यांच्या घरी द्वेष भावनेने काही लोक मारण्यासाठी गेले होते. दरम्यान परिसरातील दोन युवक त्यांना वाचविण्यासाठी गेले असता एका युवकाला अमानुष मारहाण करत त्याचा आरोपींकडून खून करण्यात आला तर एक युवक गंभीर जखमी असून मृत्यूशी झुंज देत आहे. दरम्यान पोलिसांनी काही महिला आरोपींसह युवकांना अटक केली. अटकेतील सर्व आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी व हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे अशी मागणी राजू झोडे यांनी केली आहे. यावेळी मनोज तोडसाम अरूणा तोडसाम प्रदीप झामरे अविनाश रामटेके सुजाता ढोले संध्या किनाके लिना आत्राम राधा उपासे क्षमा रणदिवे भारती कदम रेखा देशभ्रतार आदि नागरिक उपस्थित होते.

## सरपंच वरदानसिंग चव्हाण यांचा वाढदिवस सामजिक उपक्रमाने साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नांदा तांडा येथील दिनांक 8 नोव्हेंबर युवा सरपंच वरदानसिंग चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सामाजिक उपक्रम म्हणून नांदा तांडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १८० मुलांना शालेय साहित्य तसेच मिठाई खाऊचे वाटप करण्यात आले.. यावेळी मुख्याध्यापक वाणी सर शिक्षक तांगडे सर, नाइकडे सर, चव्हाण सर ,तायडे सर ,शहाणे सर उपसरपंच गणेश राठोड ग्रामसेवक पाटील सर, सदस्य कवर सिंग चव्हाण, प्रकाश राठोड, पंडीत चव्हाण, सोना राठोड ,बद्री चव्हाण, अरुण चव्हाण, आत्माराम चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण ,रवी पवार ,ज्ञानेश्वर जाधव राजू जाधव,श्याम राठोड,सचिन राठोड व गावातील प्रतिष्ठित नागरिक, शिक्षकवृंद, विद्यार्थी व युवकांचा सहभाग होता.



## जरांगे पाटलांच्या हस्ते डॉ. बछिरे यांच्या पुस्तकाचे विमोचन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते प्रा.डॉ. गोपाल बछीरे यांच्या ओबीसी



आरक्षणावरील पुस्तकाचे विमोचन संभाजीनगर येथे करण्यात आले. ओबीसी आरक्षणाचा लढा हा स्वातंत्र्यानंतर पासूनच सुरू झालेला आहे महाराष्ट्रामध्येच नव्हे तर संपूर्ण भारतात हा प्रश्न आहे, हा प्रश्न सोडवण्यासाठी ओबीसी समाजाला आरक्षण देण्याकरिता कलम १४९ लागू करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अक्षरशः आपले कायदेमंत्री पद सुद्धा त्यागले होते. म्हणून केंद्र सरकारने काळेलकर आयोगाची निर्मिती केली सदरील आयोगाच्या शिफारशी थंड बसत्यात पडून राहिल्या १९७७ च्या निवडणुका जिंकण्यासाठी जनता पक्षाने जनतेला विश्वास दिला की, आम्ही काळेलकर आयोगाच्या शिफारशी मान्य करून व सरसकट ओबीसींना आरक्षण देऊ, सत्तेत आल्यानंतर जनता पक्षाने ओबीसींना कमिशन जुनं झालं म्हणून ते रद्द केलं आणि नव मंडल कमिशन अथवा आयोगाची स्थापना केली. मंडल आयोगाने आपले काम पूर्ण इमाने इतबारे केले तरीही त्याच्या शिफारसी १९८० ते १९९० पर्यंत थंड बस्त्यात पडून राहिल्या कोणत्याही हालचाली झाल्या नाही पुढे ७ ऑगस्ट १९९० ला व्ही.पी. सिंग प्रधानमंत्री असताना त्यांनी मंडळ आयोग लागू करण्याची ऐतिहासिक घोषणा केली. या घोषणेला कडाडून विरोध झाला आणि याला विरोध करणारे सर्व संघ परिवाराचे त्यांनी ओबीसी व सर्वसामान्यांचे ध्यान भडकवण्यासाठी, त्यांचे हिंदुत्व जागृत करण्यात आले. त्यांना हिंदू मुसलमान या भानगडीत अडकवण्यात आले त्यांना मंदिर मशिदीमध्ये कोंडून ठेवले आणि आजही तेच सुरू आहे. याच संपूर्ण गोष्टीचा थोडक्यात आढावा घेण्याचं आणि सर्व ओबीसी बांधवांपर्यंत सत्य पोहोचवण्याच्या हेतूने व डोळ्यावरची अंधभक्तीची पट्टी हटवण्याच्या उद्देशाने व त्यानंतर  जरांगे पाटील यांच्या ओबीसी आरक्षणावरील लढ्याला डोळ्यासमोर ठेवून हे पुस्तक लिहिण्यात आले.




महाराष्ट्र Business Katta












# संस्कृतीवर वरचढ विकृती



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारत देश हा विविधतेने नटलेला देश आहे. विविधतेमध्ये एकता हेच भारताचे सर्वात मोठे व प्रभावी वैशिष्ट्य आहे. खाण पाण रहानी मानापासुन तर सन उत्सव संस्कृती प्रत्येक ठिकाणी विविधता आढळून येते. प्रत्येक समुदाय आपल्याला संस्कृती चे जतन करून आपापले सन उत्सव मोठ्या आनंदाने साजरे करत असतो. कोणत्याही समुहाचे सन उत्सव असले तरीही सामाजिक वातावरणात आपुलकी, जिव्हाळा व आनंदाचे वातावरण असते. जसे इद असेल तर महिना भर मुस्लीम समाज आपल्या घरातील शिरखुर्मा आपल्या देशाबांधवाना मोठ्या आनंदाने आपुलकी ने देऊळ बंधुभाव जपत असतात.**

दिवाळी असेल तर हिंदु समुदाय महिनाभर चांगल्या फराळाची चव आपल्या देश बांधाना देत असतात. सन उत्सव साजरा करताना मनात चुकीचे विचार, दुसऱ्या बद्दल दुय्यम अथवा हिन भावना मनामध्ये येत नाही. मानसाला माणूस म्हणून बघितले जाते. व माणसाला आपुलकी ने आपल्या घरी केलेल्या मिठाईचा गोडवा आपुलकी ने दिला जातो. सन उत्सव च्या पद्धतीने साजरे होऊन समाजात शांतता, आनंद व एकोप्याची भावना असते तिच भावना जर वर्षभर प्रत्येकांच्या मनात असेल तर सामाजिक वातावरण दुषीत होणार नाही. कारण सामाजिक वातावरण दुषीत होण्याच्या घटना खुप वाढल्या आहेत. एकिकडे देशात अनेक सन उत्सवाच्या माध्यमातून संस्कृती जपुन लोकांवर सामाजिक संस्कार घालुन माणुसकी ची शिकवण दिली जाते. परंतु सामाजिक वातावरण दुषीत करणारी विकृती येते तरी कुठून? सामाजिक विकृती पसरवणारे लोक आहेत तरी कोण? सामाजिक वातावरण दुषीत करून त्याचा फायदा नेमका कोणाला आहे आणि सर्वसामान्य लोकांचे सामाजिक वातावरण दुषित होऊन जी सामाजिक तेढ निर्माण होते त्यामध्ये काय नुकसान आहे. हे जोपर्यंत आपल्याला समजणार नाही तोपर्यंत आपण वर्षे भर कितीही सन उत्सव साजरे केले आणि सन उत्सव साजरे करताना मनात कोणतेही विचार नसतानाही आपण समाजातील वास्तविक परिस्थिती डोळेझाक करू शकत नाही. कारण एकीकडे संस्कृती चे काटेकोर पणे जतन करणारे लोक असताना विकृती डोके वर काढत आहे. फक्त डोकेच वर काढत नाहीत तर या विकृती ने अनेकांचे सामाजिक व वैयक्तिक जिवन उद्ध्वस्त केले हे विसरून चालणार नाही. सन उत्सवाच्या माध्यमातून एकतेचा संदेश देणारा भारत महान देश आहे, जेव्हा सर्वसामान्य लोक वैयक्तिक पातळीवर गावामध्ये जिवन जगतात तेव्हा कोणताही भेद न करता सर्व कामे एकदम व्यवस्थित होत असतात. एक काम दुसऱ्या कामावर अवलंबून असते आणि या कामाच्या साखळी मध्ये प्रत्येक जाती धर्माणे लोक जोडले गेलेले असतात. एवढे काही सुरळीत असताना मग अचानक एखाद्या ठिकाणी जातीय वाद होऊन जातीय दंगल होते, दुसरीकडे कुठेतरी धार्मिक वाद होऊन धार्मिक दंगल होते. आणि या दंगली मध्ये दोन्ही समुहाच्या तरुणांवर गुन्हे दाखल होतात. ज्या कारणासाठी दंगल झाली त्याबद्दल कोणालाच काही माहिती नसते परंतु एकदा तरुणांवर गुन्हे दाखल झाले की दोन्ही समुहाला कोर्ट कचरीच्या फेऱ्या माराव्या लागतात. मानसिक व आर्थिक पिळवणूक होते. आज पर्यंत आनंदाने, प्रेमाने आपुलकी व बंधुभावाने वागणारे लोक एकमेकांचे शत्रु झालेले असतात. हे शत्रुत्व एका पीढीतुन दुसऱ्या पिढीत जाते. दुसरी गोष्ट म्हणजे मानसिक व आर्थिक नुकसान होऊन गुन्हे दाखल झालेल्या तरुणांना शिक्षण नोकरी ला मुकावे लागते. म्हणजे आपण बंधुभाव व एकात्मतेने वागलो तर प्रेम, आपुलकी, कायम राहून मानसिक व आर्थिक हानी होत नाही. आणि एकतेने बंधूभावाने वागले पाहिजे हिच शिवकण संस्कृती आणि संस्काराच्या माध्यमातून मिळत असेल तर माणसाला माणसा पासून दुर नेण्याची व तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त करण्याची विकृती समाजामध्ये का रुजत आहेत. धर्माची शिवकण व संस्कृती एवढी कमकुवत आहे की तीला कोणीही मोडून काढून त्याचा वापर करून घेईल? धर्म आणि संस्कार आपल्याला लहाधपणा पासुन बंधुभाव शिकवत असतील तर द्वेष भाव नेमका येतो कुठुन? धर्माच्या शिवणीपेक्षा, संस्कारापेक्षा स्वतः च्या फायद्यासाठी धर्माचा वापर करणारा लोकांनी ओळखु नये? काही मोजक्याच लोकांच्या सांगण्यावरुन धर्माची शिकवण व संस्कार पायदळी तुडवणे आपल्या नितीमत्तेमध्ये बसते? असे अनेक प्रश्न उपस्थित राहतात. व धर्म आणि जाती याच्या नावावर राजकारण करून सत्ता भोगणारे लोक समाजात तेढ व द्वेष निर्माण होईल असे वातावरण प्रत्यक्ष अप्रत्यक्ष निर्माण करतात. राजकारणात बापावर विश्वास ठेवू नये असे सांगितले जाते तरीही लोक राजकारणी नेत्यावर विश्वास ठेवतात याचे कारण राजकीय नेते ज्यांना सत्ता भोगुन सर्वसामान्य लोकांचे आजही शोषण करायचे आहे. ते लोक वेगवेगळ्या जाती धर्मातील लोक हाताशी घेऊन त्यांना जाती धर्माबद्दल एखादे वादग्रस्त विधान करायला लावतात. एकदा वादग्रस्त विधान झाले की महिना दोन महिने लोकांचे लक्ष मुख्य समस्येवर येत नाही. शिक्षण, रोजगार, नोकरी, आरोग्य सुविधा व महागाई विषय बाजूला जातात. आणि कोणत्या जातीचे वा धर्माचे बरोबर आहे यासाठी वैयक्तिक पातळीवर जाऊन टिकाटीप्पणी करणे, एकमेकांना दोष देणे, वेळप्रसंगी दंगल घडणे आणि दंगल घडली की सर्व सामान्य लोकांवर गुन्हे दाखल होतात. आणि ज्यांनी वादग्रस्त विधान केले ते राजकारणी, त्यांचे मुलं, त्यांचे जवळचे नातेवाईक यांच्या वर एकही गुन्हा दाखल होत नाही. गुन्हे दाखल कोणावर होतात तर भाऊच्या ऑफिस भोवताली दिवसभर फिरून भाऊंसाठी काय पण म्हणणाऱ्या तरुणांवर, गुन्हे दाखल होतात अभ्यास करून नोकरी साठी खटाटोप करणाऱ्या तरुणांवर जेव्हा भाऊंसाठी कायपण म्हणतो आणि भाऊसाठी, भाऊच्या बोलण्यामुळे स्वतः च्या अंगावर गुन्हे दाखल होतात तेव्हा मात्र भाऊंना जमानत घ्यायला, आधार द्यायला वेळ नसतो. हि वास्तविक परिस्थिती समजून घेणे आवश्यक आहे. एकिकडे जनता व दुसरी कडे घाण केलेले राजकारण हे दोन आज वेगवेगळे आहे. अर्थात राजकारण योग्य पद्धतीने व जनतेच्या व देशाच्या हितासाठी केले तर भारत जगातील स्वर्ग बनेल असे वक्तव्य मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायधिशांनी केले होते. परंतु



राजकारण चुकिच्या लोकांच्या हाती गेल्याने आणि राजकारणात लोकांच्या समस्या चा विचार न करता जाती धर्मावर राजकारण केल्याने राजकारणाची नैतिक पातळी खालावली आहे. म्हणजे सर्वसामान्य मानसाचा धर्म व राजकीय नेत्यांचा धर्म एक होऊ शकत नाही. ही गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. लोकांचा धर्म असतो एकमेकांना साह्य करून, एकमेकांच्या अडी अडचणीमध्ये धावून जाने व मदत करणे. राजकीय नेत्यांचा धर्म असतो जनतेच्या हक्काचे खाने, मानसा माणसात वाद निर्माण करणे व लोकांच्या समस्या वाढवणे. सर्व सामान्य लोकांची संस्कृती व संस्कार वेगळे आहेत, राजकीय लोकांचे संस्कृती व संस्कार वेगळे आहेत. सर्व सामान्य जनतेने शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा, महागाई हक्क अधिकार यावर बोलु नाही म्हणून लोकांमध्ये फुट पाडली जाते जाती धर्माच्या नावावर लढवले जाते. परंतु राजकीय सत्तेतुन स्वतः चे खरे भरण्यासाठी सर्वजन एकत्र येऊन जनतेची लुट करतात. भाऊ, नाना, दादा अण्णासाठी लोक रस्त्यावर येऊन प्रचार करतात, डोक्यावर घेतात, परंतु लोकांना जेव्हा भाऊ, दादा अण्णा यांची गरज असते तेव्हा ते मात्र रस्त्यावर कधीच दिसत नाहीत हि वास्तविक परिस्थिती लक्षात घेऊन जागृत होणे आवश्यक आहे. पुर्वी पासून चालत आलेली संस्कृती, संस्कार हे केवळ राजकारणी लोकांसाठी पायदळी तुडवणे योग्य नाही. आपण सध्य परिस्थिती जरी बघितली तरी लहानातील लहान विषय मोठ्यात मोठा करून त्यामध्ये जातीय तेढ निर्माण करून एका जातीचा शत्रु दुसरी जात दाखवली जात आहे. अर्थात ही सर्व मांडणी राजकीय क्षेत्रातुन केली जाते. आपण ज्या धर्मात राहतो, ज्या धर्माने आपल्या वर संस्कार घातले त्या धर्माची अशी शिवकण आहे का आपल्याच धर्मातील जात आपल्याच धर्मातील जातीची शत्रु आहे? राजकिय नेते धर्म व जातीचा वापर त्यांच्या फायद्यानुसार करून घेऊन सत्तेची पोळी भाजून जनतेला मात्र उपाशी ठेवत आहेत. हे विसरून चालणार नाही. नेत्यांचे मुलं विदेशात शिक्षणाला आहेत. येथे लोकांकडे फि भरायला पैसे नाहीत. नेत्यांची मुल शिक्षण घेतांना करोडोचे मालक आहेत, येथे मेहनत करून बँक बँलन्स नाही, नेत्यांचे घरे हजारो करोडो रुपयांचे आहेत येथे सर्वसामान्य लोकांच्या घराची विट बदलने होत नाही, बऱ्याच लोकांकडून घरावरचे पत्रे बदलने होत नाहीत. राजकीय नेत्यांच्या शेतात करोडो रुपयांचा माल होतो शेतकरी रात्रंदिवस घाम गाळतो वर्षाकाठी त्याला मजुरीही उरत नाही. जनतेला लुटणाऱ्या, जनतेच्या धार्मिक पणाचा फायदा घेऊन सर्वसामान्य लोकांचे भविष्य उध्वस्त करण्याबाबत बोलले तर साहेबांच्या विरोधात बोलु नका म्हणणारे हि सर्वसामान्यच असतात. परंतु साहेब जनतेचा पुर्ण निधि लाटतो, शिक्षण नोकरी दवाखान्याचे खाजगीकरण होते तरीही बोलत नाही, शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळत नाही तरीही तोंडुन शब्दही काढत नाहीत अशा या साहेबांच्या वागण्याला संस्कृती म्हणायचे का विकृती? देशात अनेक सन उत्सव असतात. प्रत्येक व्यक्तीला अस वाटतं आपण आनंदाने उत्सव साजरा करून परिवारासोबत दोन घास चांगले खावे. पण आर्थिक परिस्थिती नाही. हि बाब लक्षात घेऊन सरकारने गरीबीची थट्टा केली आणि आनंदाचा शिक्षा म्हणून राशन मधुन काही खाद्यपदार्थ देशातील करोडो परिवारांना दिला जातो. राजकीय नेत्यांनी एक दिवस तरी आनंदाचा शिधा घेऊन आपल्या कुटुबांसोबत सन उत्सव साजरा करून दाखवावा. आनंदाचा शिधा नावाखाली गरीबांची चेष्टा सुरू आहे. एकिकडे दादा भाऊच्या मतदार संघात मोठ्या प्रमाणात आनंदाचा शिधा वाटला जातो. दुसरीकडे दादाची भाऊची संपत्ती शेकडो करोडो रुपये होऊन बसली हे कस शक्य आहे? नेमकी कोणती कमाई असते ही? आणि यालाच संस्कार म्हणायचे का? हा मुळ प्रश्न मात्र अजूनही कायम राहतो. दिवाळी हा सन सर्वात मोठा व प्रतिष्ठेचा मानला जातो. हा सन साजरा करायला कितीही लोकांनी कर्ज काढून सनाची तयारी केली आहे. एकिकडे वेगवेगळ्या कंपनीने, बँकांचे कर्ज व दुसरी कडे सनासाठी पुन्हा कर्ज खरंच त्या कुटुंबाला खरात बनवलेल्या नैवद्यात मनापासून आनंद मिळेल का? कर्जाचा डोंगर डोक्यावर असताना शांत झोप तरी लागेल का? अशा अनेक समस्या समोर आहेत. म्हणून सर्वसामान्य लोकांनी जागृत होऊन राजकारणी लोकांकडून धर्म व संस्कृती शिकु नये. कारण तेथे धर्माच्या नावाखाली विकृती पसरवून जनतेला समस्या ग्रस्त केले जाते. उलट जनतेने एकत्र येऊन शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा महागाई विषयी प्रश्न विचारावे, शेतमालाला भाव माघावा आणि आपल्या संस्कारानुसार एकता व बंधुतेने वागावे तरच आपण वर्षभर सन उत्सव साजरे करून जो संदेश देतो तो सार्थक होईल व प्रत्येक घरात वातावरण आनंदीत राहील.

# “हो गई गलती, जाने दो यार...!”

आधुनिक केसरी

**नव्या आणि जुन्या काळातील हिंदी चित्रपटगीतांचा विषय जेव्हा जेव्हा निघतो तेव्हा तेव्हा आजही लोकांना जुन्या गीतांनाच प्राधान्य द्यायला आवडते. संगीत दिग्दर्शकांनी आपल्या चालींनी आणि पार्श्वगायक-पार्श्वगायिकांनी आपल्या स्वरांनी ती गीते अशी काय सजवून ठेवली आहेत की त्यांचा गोडवा आजही जशाचा तसा टिकून आहे. जीव ओतून गीत गाणाऱ्या पार्श्वगायकांमधे गीताच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळी गीताचा दर्जा राखण्यावरून कधी कधी शाब्दिक चकमकीही उडत असत. एका चित्रपटगीताच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळी असाच काहीसा प्रकार घडला होता. गीताच्या ध्वनिमुद्रणानंतर पार्श्वगायिकेने आपल्या सहपार्श्वगायकाला ते गीत दुसऱ्यांदा ध्वनिमुद्रित करावयास सांगितले. त्या गायकाने ते गीत दुसऱ्यांदा ध्वनिमुद्रित केलेही; पण त्या गायिकेबरोबर पुन्हा गीत गाणार नाही, हेही स्पष्टपणे सांगून टाकले !**

१९७३ साली प्रदर्शित झालेल्या नासिर हुसेननिर्मित-दिग्दर्शित `यादों की बारात' या चित्रपटातील एका गीताच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळी घडलेली ही घटना आहे. या चित्रपटातील "आपके कमरे में कोई रहता है, हम नहीं कहते जमाना कहता है...." या गीताचे ध्वनिमुद्रण व्हावयाचे होते. हे गीत गीतकार मजरूह सुलतानपुरी यांनी लिहिले होते आणि त्याला संगीतकार राहुल देव बर्मन यांनी चाल लावली होती. हे गीत किशोर कुमार, आशा भोसले आणि खुद्द राहुल देव बर्मन हे तिघे गाणार होते. गीत ध्वनिमुद्रित झाल्यावर आशा भोसले यांनी ते ऐकले तेव्हा त्यांना वाटले की गीत आणखी चांगले झाले असते. त्यात काहीतरी कमतरता राहिली आहे, ती भरून काढून गीत अधिक श्रवणीय केले पाहिजे. त्या किशोर कुमार यांना म्हणाल्या, की दादा हे गीत पुन्हा एकदा ध्वनिमुद्रित करूया. किशोर कुमार यांनी चमकून त्यांना विचारले, दुसऱ्यांदा ध्वनिमुद्रण ? पण कशासाठी ? यावर आशा भोसले त्यांना म्हणाल्या, स्टुडिओत शंभर लोकांनी हे गीत ऐकले आहे. नंतर हजारो लोक ऐकतील. आपल्या चुका लोकांच्या लक्षात आल्यावर ते काय म्हणतील ? ते ऐकताच किशोर कुमार म्हणाले, ठीक आहे, गीत पुन्हा ध्वनिमुद्रित करूया. गीत उत्तम प्रकारे ध्वनिमुद्रित झाले. त्यात कसलीही उणीव राहिली नाही.

गीताचे दुसऱ्यांदा ध्वनिमुद्रण झाल्यावर किशोर कुमार पंचम (राहुल देव बर्मन) यांच्याजवळ जाऊन त्यांना म्हणाले, यापुढे





मी आशा भोसले यांच्याबरोबर गीत गाणार नाही ! ते ऐकताच राहुल देव बर्मन यांच्या हाता-पायातील त्राणच गेले. ते चांगलेच घाबरले. त्यांनी धावत जाऊनच आशा भोसले यांना गाठले आणि विचारले, की तुम्हां दोघांत काही खटका उडाला आहे का ? आशा भोसले म्हणाल्या, की मी त्यांना केवळ गीत दुसऱ्यांदा ध्वनिमुद्रित करायला सांगितले त्याचा त्यांना राग आला. त्यावर राहुल देव बर्मन आशा भोसले यांना म्हणाले, तुमच्याबरोबर यापुढे गीत गाणार नाही, असे किशोर कुमार मला म्हणाले. यावर आशा भोसले म्हणाल्या, की मीही त्यांच्याबरोबर गाणार नाही.

या गीतानंतर या चित्रपटातील “ओ मेरी सोनी, मेरी तमन्ना, झूठ नहीं है मेरा प्यार...” या द्वंद्वगीताचे ध्वनिमुद्रण करावयाचे होते. पण समस्या अशी होती, की हे गीतही किशोर कुमार आणि आशा भोसले हेच गाणार होते. आशा भोसले यांच्याबरोबर मी गीत गाणार नाही असे किशोर कुमार यांनी सांगितले असले तरी राहुल देव बर्मन यांनी दहा-पंधरा दिवस त्यांची मनधरणी केल्यावर ते आशा भोसले यांच्याबरोबर गीत गाण्यासाठी तयार झाले. ध्वनिमुद्रणाच्या स्टुडिओत पोहोचताच राहुल देव बर्मन यांना किशोर कुमार म्हणाले, आशा भोसले डावीकडे पाहून गातील आणि मी उजवीकडे पाहून गाईन. यावर आशा भोसले म्हणाल्या, डावीकडे पाहून गा नाही तर उजवीकडे पाहून गा, मला काही फरक पडत नाही ! यथावकाश ध्वनिमुद्रण सुरू झाले. आशा भोसले यांचा अंतरा काही वेळाने होता म्हणून त्या भिंतीवर फुले-पानांची चित्रे काढू लागल्या. इकडे किशोर कुमार यांनी गीतगायन सुरू केले. “ओ मेरी सोनी, मेरी तमन्ना, झूठ नहीं है मेरा प्यार, दीवाने से हो गई गलती, जाने दो यार....!” पहिल्या दोन ओळी गाऊन पूर्ण झाल्यावर किशोर कुमार याच दोन ओळी पुन्हा गाऊ लागले आणि “ओ मेरी सोनी...” हे शब्द त्यांनी उच्चारताच काही तरी गडबड झाली आणि त्यांनी `कट' म्हटले. त्यांनी `कट' म्हणताच ध्वनिमुद्रणाच्या कक्षात स्तब्धता पसरली. सगळे वाद्यवादक थांबले. तेवढ्यात किशोर कुमार वळले आणि आशा भोसले यांच्याकडे पाहात म्हणाले, किती वेळ मी पाहतोय तू त्या भिंतीवर चित्रे काय काढत बसली आहेस? मी चुकीचे गातोय हे तुला सांगता येत नव्हते का? यावर आशा भोसले त्यांना म्हणाल्या, की तुम्हीच तर सांगितले होते ना की तू डावीकडे पाहा आणि मी उजवीकडे पाहीन म्हणून ! यात आता माझी काय चूक? ते ऐकताच किशोर कुमार त्यांना म्हणाले, जाऊ दे ना आशा, असे होते कधी कधी....तुला आठवते का, महालक्ष्मी रेल्वे स्थानकावर आपण दोघे वडा-पाव खात होतो तेव्हा तू माझ्या अंगावर चहा सांडला होतास. माझ्या पांढऱ्या कपड्यांवर डाग पडला होता. मी तेव्हा तुला काही बोललो होतो का? नाही ना? आता तूही काही म्हणता कामा नये. किशोर कुमार यांनी हे सांगताच आशा भोसले यांच्या चेहऱ्यावर हसू उमटले आणि मग गीत खेळीमेळीच्या वातावरणात ध्वनिमुद्रित झाले.

अनिल रा. तोरणे
९२२६१६०६५४

# चळवळीचा आक्रमक चेहरा : पवन धायगुडे



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**गेली काही वर्षापासून खेड बुद्रुक ता.खंडाळा येथील पवन धायगुडे हे जनतेच्या समस्या शासन दरबारी अगदी तळमळीने मांडण्याचा प्रयत्न करत आहेत.त्या समस्या मांडत असताना समस्या सोडविण्यापर्यंत त्यांच्या कडून पाठपुरावा केला जात असतो.त्यामुळे त्यांच्या या कार्य पद्धतीबद्दल जनतेकडून त्यांना धन्यवाद दिले जात असतात. त्यांच्या कार्याचे कौतुक सुद्धा केले जात असते. आज आंबेडकरी चळवळीचा एक आक्रमक पदाधिकारी म्हणून पवन धायगुडे यांच्या कडे पाहिले जाते.अन्यायाच्या विरोधात नेहमी आवाज उठविणारे पवन धायगुडे यांची ओळख खंडाळा तालुक्यातील जनतेला ज्ञात झालेली आहे. तालुक्यातील कोणताही प्रश्न असो,तो प्रश्न निवेदनाच्या माध्यमातून प्रशासनाकडे ते मांडत असतात.**



पवन धायगुडे हे रिपब्लिकन पक्षात कार्य करत असून पक्षाचा एक आक्रमक पदाधिकारी म्हणून त्यांनी आपला एक आदेशानुसार तसेच महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पवन धायगुडे हे खंडाळा तालुक्याची अध्यक्ष पदाची धुरा गेली दोन वर्षांपासून सांभाळत आहेत. खंडाळा तालुक्यात काम करत असताना त्यांनी पक्षाचा चांगलाच वचक सुद्धा निर्माण केलेला आहे. चळवळीचे कार्य पुढे घेऊन कसे जायचे यासाठी पवन धायगुडे यांना दादासाहेब ओव्हाळ यांच्या कडून मार्गदर्शन मिळत असते. त्यामुळे पवन धायगुडे यांनी हाती घेतलेले कोणतेही काम पूर्णत्वास जात असते. पक्षाचा मोठा पाठींबा त्यांच्या सोबत असतो. त्यामुळे ते मोठ्या ताकतीने जनतेची कामे करत असतात. त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी निवेदन दिले. आंदोलनाचा एल्गार ही पुकारला गेला. शोषित, वंचित, घटकातील लोकांना मदत करण्यासाठी सतत कार्यरत असतात. कुठल्याही समाजाच्या लोकांवर अन्याय अत्याचार झाल्यास पेटुन उठणारे व आक्रमक भूमिका घेत आंदोलन करणारे असे व्यक्तिमत्व पवन धायगुडे यांच्या रूपाने खंडाळा तालुक्यात तयार झालेले आहे. जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असे ते नेहमी त्यांच्या कार्यातून दाखवत असतात.अन्याया विरोधात प्रतिकार केला पाहिजे.ही शिकवण आपल्याला विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली आहे.

रिपब्लिकन पक्षच हा बाबासाहेबांच्या विचारांना पुढे घेऊन काम करत आहे, अशी भावना सुध्दा पवन धायगुडे हे त्यांच्या मनोगतातून नेहमी व्यक्त करत असतात.खंडाळा तालुक्यात सुद्धा विविध प्रश्न जनतेला भेडसावत असताना त्या प्रश्नाना पक्षाच्या माध्यमातून आंदोलन रुपी कसे सोडविता येईल यासाठी ते सदैव कटिबद्ध असल्याचे त्यांच्या कार्यातून दिसून येते.

खंडाळा तालुक्यात औद्योगीकरण वाढत असताना स्थानिक भुमिपुत्रांना हक्काचे काम मिळण्यासाठी पवन धायगुडे सुद्धा पक्षाच्या माध्यमातून प्रयत्नशील आहेत. तालुक्यातील वाडी, वस्तीवरील लोकांना नागरी सुविधा तसेच हक्काचा रस्ता मिळण्यासाठी ते निवेदने देत आलेले आहेत. त्यांनी गावातीलच स्मशानभुमीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केला, खंडाळा तालुक्यातील विविध प्रकारचे सामाजिक विषय हाती घेऊन प्रशासनाला जाग आणण्यासाठी अनेक वेळा आक्रमक भूमिका घेत आंदोलने केलेली आहेत. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो याची जाणीव ठेवून ते तळागाळातील लोकांच्या समस्येपर्यंत जाऊन पोहचण्याचा व त्यांची समस्या जाणुन घेण्याचा प्रयत्न करत आहेत.

सामाजिक प्रबोधन घडवून आणण्यासाठी शाहू, फुले आंबेडकरांनी आपला हा महाराष्ट्र घडविला आहे. त्यांच्याच विचारांची कास धरून सर्वसामान्य जनतेच्या न्याय हक्कासाठी यापुढे ही लढत राहीन असा विश्वास पवन धायगुडे यांनी व्यक्त केलेला आहे. चळवळ गतिमान करणारे पवन धायगुडे खऱ्या अर्थाने त्यांच्या कार्यपद्धती मुळे खंडाळा तालुक्यात रिपब्लिकन पक्षाची ताकत निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. अनेक अन्याय ग्रस्त लोकांच्या समस्या त्यांच्या पर्यंत येत आहेत. ते सोडवण्यासाठी तयार राहत असतात.हा पक्ष आपली कामे करत आहे. असा विश्वास सुद्धा लोकांना वाटू लागला आहे. त्यामुळे प्रत्येक प्रश्न पवन धायगुडे यांच्या कडे येत असतात.

पवन धायगुडे यांची काम करण्याची पद्धत सुद्धा लोकांना आवडू लागलेली आहे.प्रत्येक समस्या प्रशासनापर्यंत घेऊन जाताना त्या प्रश्नी ते वारंवार पाठपुरावा करत असतात.म्हणून तर त्यांच्या कडे तालुक्यातीलच नव्हे आस पासच्या भागातून सुद्धा आवाज दिला जात असतो. जनतेच्या समस्या सोडविणारा व अन्यायाच्या विरोधात उभा राहून न्याय मिळवून देण्याचे निर्भीड पणाचे धाडस पवन धायगुडे दाखवत असतात. आज त्यांच्या कार्यामुळे ते जनतेला परिचित झालेले आहेत. रोखठोक आणि परखड पणे आपली भूमिका जनतेच्या न्यायासाठी मांडणारे पवन धायगुडे खऱ्या अर्थाने चळवळीतून आलेला एक चळवळीचा आक्रमक चेहरा बनलेला आहे. ह्याच चेहऱ्याकडुन यापुढे ही अशीच जनसेवा व जनतेच्या समस्यांना न्याय मिळवुन देणारी कामे घडत राहोत, अशी अपेक्षा लोकांकडून व्यक्त केली जात आहे. नक्कीच हीच सेवा येणाऱ्या काळात सुद्धा लोकांची कामे करत असताना अगदी तळमळीने करत राहीन असा आशावाद पवन धायगुडे यांच्या कडून व्यक्त केला जात असतो.



# वाल्हे सरपंचपदी अतुल गायकवाड यांची निवड

## सत्कारप्रसंगी बाबासाहेबांची प्रतिमा अन् महात्मा फुलेंचे पुस्तक भेट

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**निरा-शिवतक्रार :** पुरंदर तालुक्यातील वाल्हे या गांवच्या सरपंचपदी अतुल गायकवाड यांची निवड झाल्याबद्दल फुले, शाहु, आंबेडकर चळवळींच्या वतीनर यथोचित असा सन्मान करण्यात आला.हा सन्मान करत असताना त्यांना विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा आणि महात्मा फुले यांचे पुस्तक भेट देण्यात आले. यावेळी सदस्य सागर भुजबळ यांचा ही सत्कार केला. यावेळी जेजुरीचे माजी नगराध्यक्ष अविनाश भालेराव,आंबेडकरी चळवळीचे दादासाहेब गायकवाड,अमोल साबळे,अण्णाभाऊ साठे विकास प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सुनील अण्णा पाटोळे आदींसह इतर उपस्थित होते. यावेळी आंबेडकरी चळवळीचे दादासाहेब गायकवाड यांनी मनोगत व्यक्त करत असताना नव नियुक्त सरपंच अतुल गायकवाड यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी दादासाहेब गायकवाड यांनी शासनकर्ती जमात बना हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संदेशाची आठवण करून दिली. या पदाच्या माध्यमातून जनतेची कामे करावी.अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच या अनमोल अशा सत्काराबद्दल सरपंच अतुल गायकवाड यांनी सर्वांचे आभार मानले.

# बांधकाम साहित्य उघड्यावर ठेवणाऱ्यास होणार दंड

आधुनिक केसरी न्यूज




**चंद्रपूर :** शहरांमधील एअर क्वालिटी इंडेक्स दिवसेंदिवस खालावत चालला आहे त्यामुळे वाढते वायु प्रदूषणास रोखण्यासाठी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार चंद्रपूर महानगरपालिकेद्वारे पाऊले उचलली जात असुन यापुढेत बांधकाम साहीत्य रस्त्यावर टाकणाऱ्यांवर गंभीर स्वरूपाची कारवाई केली जाणार आहे.

वायु आणि विविध प्रकारचे प्रदूषण यामुळे श्वसनासंबंधी व इतर आजार उद्भवतात. यास कारणीभुत घटकांवर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने मा.उच्च न्यायालयाने काही निर्देश दिलेले आहेत. यात शहरात अनेक ठिकाणी बांधकामे सुरु असतात, ही बांधकामे सुरु असतांना त्यात वापरण्यात येणाऱ्या विटा, रेती, सिमेंट, गिट्टी, व इतर साहित्यामुळे मोठ्या प्रमाणात धुळीचा त्रास व पर्यायाने वायू प्रदूषण होत असल्याचे दिसून येते. वास्तवीक कोणत्याही इमारतीचे बांधकाम सुरु असतांना सदर स्थळाच्या चारही बाजूस खालच्या भागापासून ते बांधकामाच्या उंचीपर्यंत ग्रीन नेटचा वापर करणे आवश्यक आहे. ज्यायोगे बांधकाम साहित्यामुळे उडणाऱ्या धुळीचा त्रास इतरांना होणार नाही.यापुढे अश्या बांधकामांवर सक्त कारवाई केली जाणार आहे. त्याचप्रमाणे डेब्रिजची वाहतुक न करता त्याच ठिकाणी विल्हेवाट लावण्याच्या सूचनाही देण्यात येत आहेत. भारत सरकार अधिसूचना क्रमांक जी.एस.आर. 682(ई), दि. 05/10/1999 अन्वये 125 डेसिबल (एआय) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणा-या फटाक्यांचे उत्पादन, विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार बेरियम सॉल्ट, लिथीयम, अर्सेनिक, लीड, मर्क्युरी यासारखे घटक असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे. या घटकांमुळे विषारी वायू तयार होतात आणि हे वायू प्राणी व वनस्पती या दोघांना घातक आहेत.त्यामुळे शक्यतो हरित दिवाळीच साजरी करावी,फटाके फोडायचे असल्यास सायंकाळी ७ ते १० दरम्यानच फोडण्यात यावे. त्याचप्रमाणे बंदी असलेल्या प्लास्टीकचा वापर करणाऱ्यांवरही कारवाई केली जाणार आहे. धुळीचे प्रमाण कमी करण्यास स्वच्छतेवर भर देऊन धुळ उडु नये याकरीता पाणी शिडकले जर आहे. बांधकाम साहित्य वाहून नेणारी वाहने पूर्णपणे झाकलेली नसणे, राडारोडा वाहून नेणारी वाहने स्वच्छ नसणे, बांधकामाच्या ठिकाणीही मोठया प्रमाणात स्वच्छता नसणे इत्यादींचे पालन झाले नाही तर मनपा पथकांद्वारे सक्त कारवाई करण्याचे मनपा प्रशासनातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

# ज्वारी, बाजरी व मक्याची हमीभावाने खरेदी होणार

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेत हमीभावाने



खरेदीसाठी ज्वारी, बाजरी व मका पिकांसाठी ऑनलाईन नोंदणी सुरू करण्यात आली आहे. जिल्ह्यातील अकोला, अकोट, तेल्हारा, बाळापूर, पातूर, बार्शिटाकळी, मूर्तिजापूर येथील खरेदी केंद्रावर ३० नोव्हेंबरपर्यंत ऑनलाईन नोंदणी सुरू करण्यात आली आहे. संकरित ज्वारी तीन हजार १८०, मालदांडी ज्वारीसाठी तीन हजार २२५, मक्यासाठी दोन हजार ९०, बाजरीसाठी दोन हजार ५०० हमीभाव आहे.

शेतकऱ्यांची ऑनलाइन नोंदणी एनईएमएल पोर्टलवर करण्यासाठी शेतकऱ्यांच्या पिकाची नोंद असलेला सातबारा, आधारलिंक असलेला बँकेचा खाते क्रमांक, आधारकार्डाची सत्यप्रत, मोबाइल क्रमांक, तसेच ऑनलाइन नोंदणी करत्यावेळी शेतकऱ्यांचा स्वतःचा फोटो घेणे बंधनकारक आहे. ज्वारी, मका, बाजरी उत्पादक शेतकऱ्यांनी हमीभावाचा लाभ घेण्यासाठी नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी अजित कुंभार व जिल्हा पणन अधिकारी पी. एस. शिंगणे यांनी केले आहे.



# लोकार्पित झालेली वास्तु विद्यार्थ्यांसह ज्येष्ठांसाठी उपयुक्त ठरेल

## अभ्यासिकेच्या इमारतीचे आ. किशोर जोरगेवार यांच्या हस्ते लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मतदारसंघात गरिब गरजु विद्यार्थ्यांसाठी 11 अभ्यासिका तयार करण्याचा संकल्प केला होता, आज यातील एका अभ्यासिकेच्या इमारतीचे लोकार्पण करतांना आनंद होत आहे. येथे अभ्यासिकेचे साहित्य खरेदीसाठी लवकरच आपण निधी उपलब्ध करुन देणार आहोत. आजचा हा लोकार्पण कार्यक्रम आमच्या संकल्पपुर्तीकडील पाऊल असून लोकार्पित झालेली ही वास्तु विद्यार्थ्यांसह समाजातील ज्येष्ठ नागरिकांसाठी उपयुक्त ठरेल असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

आमदार निधीतून 25 लक्ष रुपये खर्च करत तुकुम येथील पसायदान ज्येष्ठ नागरिक संघ येथे तयार करण्यात आलेल्या अभ्यासिकेच्या इमारतीचे आज गुरुवारी आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला पसायदान ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रकाशराव गुंडावार, उपाध्यक्ष कुसन नागोसे, सचिव दादाजी नंदनवार, सहसचिव देवराव कोटकर, माजी नगरसेवक संदिप आवारी, दिपक तमिवार, ॲड. एम एम सातपुते, ॲड. शेख सत्तार, नथ्थु मत्ते, हिरामण भोवते, रमेश लखमापूरे, श्रावण नन्नावरे, पसायदान योग नृत्य परिवारच्या वनश्री मेश्राम आदींची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, ज्येष्ठ नागरिक संघात येऊन जेष्टांचा आर्शिवाद घेण्याचे वारंवार सौभाग्य मला मिळत आहे. येथे आल्यावर नवी उर्जा मिळते, जेष्टांच्या अनुभवातून आलेले समजा उपायोगी विचारांचा संचार येथून होतो. आपले विचार समाजासाठी उपयोगाचे आहे. ज्येष्ठ नागरिकांनी केलेल्या मागण्या पुर्ण करण्यासाठी माझे नेहमीच प्रयत्न राहिले आहे. त्यात यशही आले याचे समाधान आहे. आज येथे योगासाठी शेड तयार करण्याची मागणी आली.



त्यासाठीही आपण निधी देणार असल्याची घोषणा यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली. चंद्रपूरातील युवकांमध्ये प्रतिभा आहे. येथील काही युवकांनी मिळून हायड्रोजन कारची निर्मिती केली. अशा युवकांना आपण प्रोत्साहित केले पाहिजे. अनेक गरिब कुटूंबातील युवकांमध्ये विविध प्रकारच्या प्रतिभा दडल्या आहेत. त्या आपण शोधून त्यांना संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. त्यांच्या अडचणी समजून घेतल्या पाहिजे. कोरोणाच्या काळात खाजगी अभ्यासिकांची फी परवडत नाही हे सांगण्यासाठी काही युवक आमच्याकडे आले होते. त्या दिवशी अशा युवकांसाठी मतदार संघात 11 अभ्यासिका तयार करण्याचा संकल्प आपण केला होता. यातील 8 अभ्यासिकांचे काम सध्या युद्ध पातळीवर सुरू आहे. तर तिन अभ्यासिकांच्या इमारतीचे काम जवळपास पुर्ण झाले असल्याचे ते यावेळी बोलताना म्हणाले. लोकार्पित झालेल्या अभ्यासिकेच्या इमारतीसाठी माझे विशेष प्रयत्न सुरु होते. पसायदान ज्येष्ट नागरिक संघानेही यात मोठे सहकार्य केले आणि या एकत्रित प्रयत्नांमुळे आज येथे ही इमारत उभी राहु शकली. आता या इमारतीत अभ्यासिकेच्या साहित्यांची गरज आहे. ती पुर्ण करण्यासाठीही आपण 10 लाख रुपयांचा निधी देत असल्याची घोषणा त्यांनी यावेळी बोलतांना केली. या कार्यक्रमाला ज्येष्ठ नागरिक व परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मराठा आरक्षण विरोधी भूमिका घेणाऱ्या भुजबळ यांचा राजीनामा घ्यावा

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** कधी मराठ्यांच्या बाजुने तर कधी ओबीसी बाजुने अशी दुहेरी भूमिका नेहमीच घेणारे मंत्री छगन भुजबळ यांनी पुन्हा एक नवीन वाद निर्माण करुण तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. मराठा समाजाला ओबीसी संवर्गातुन आरक्षण दिलेच जाउ नये अशी भूमिका प्रसिद्धि माध्यमांसमोर आता उघड़ केल्याने राज्यातील तमाम मराठा समाज भुजबळ यांच्याबाबत रोष व्यक्त करत आहे. याच पार्श्वभूमीवर नाशिक जिल्हा स्वराज्य संघटना एकवटली असून मंत्री छगन भुजबळ यांनी राजीनामा द्यावा किंवा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचा राजीनामा घ्यावा अशी मागणी स्वराज्य संघटनेच्या पदाधिका-यांनी केली आहे. स्वराज्य संघनेचे जिल्हा प्रमुख उमेश शिंदे,डॉ रूपेश नाठे यांच्या नेतृत्वाखाली आज नाशकात स्वराज्य संघटना भुजबळ यांच्या विरोधात रस्त्यावर उतरले होते. अनेक पदाधिकारी यांनी भुजबळ यांचेवर गुन्हा दाखल करावा कारण ते राज्यात समाजा समाजात तेढ निर्माण होईल असे नाहक वक्तव्य करत असून त्यांची एक ऑडियो क्लिप देखील शोशल मिडियावर फिरत आहे,ज्या त मराठा समाजाच्या आरक्षण विरोधी भूमिका घेवून आता रस्त्यावर उतरा असे आदेश एका कार्यकर्त्याल देत असल्याचे त्यांच्या संभाषनातून कळत आहे.

# पोलिस दक्षता समितीच्या इगतपुरी तालुकाध्यक्षपदी रोहिदास गोवर्धने

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** तालुक्यातील सांजेगाव येथील नामवंत पहिलवान



व सामाजिक कार्यकर्ते रोहिदास पांडुरंग गोवर्धने यांची पोलिस दक्षता समितीच्या इगतपुरी तालुकाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदेश पोलिस दक्षता समितीचे संस्थापक डॉ विक्रांत पवार यांचे आदेशाने प्रदेश अध्यक्ष धीरज ठाकुर यांनी ही नियुक्ती जाहिर केली आहे. याबाबतचे नियुक्ती पत्र त्यांना नुकतेच कार्यक्रमात प्रदान करण्यात आले. पोलिस दक्षता समिती राज्यात समाजासाठी सदैव तत्पर कार्यरत असून पोलिस व नागरिकांमधील एक समन्वय व दुवा म्हणून काम करत आहे. या निवडिबद्दल आमदार राहुल ढिकले, हिरामण खोंसकर, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस गोरख बोड़के, तालुकाध्यक्ष पांडुरंग वारुंगसे, अड़ गोरखनाथ बलकवड़े, नितिन चाँदवडकर, राजू देवळेकर, लकी गोवर्धने आदिनी अभिनंदन केले आहे.



# नवनिर्वाचित सरपंच लहू झाल्टे यांचा भारतीय संविधान देवून केला सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** तिवडीचे नवनिर्वाचित सरपंच लहू झाल्टे यांना भारतीय संविधानाची प्रत देवून गौलखेड ग्रामस्थांच्या वतीने ९ नोव्हेंबर रोजी शाल व पुष्पगुच्छ देवून गौलखेड येथे सत्कार करण्यात आला. जळगाव जामोद तालुक्यातील तिवडी गावच्या ग्रामपंचायतीची निवडणूक नुकतीच पार पडली. यामध्ये लहू झालटे हे सरपंच म्हणून निवडून आले. लहू झालटे हे तरुण असून यावेळी गावकऱ्यांनी तरूणाईला प्राधान्य देत सरपंच पदांची माळ लहू झालटे यांच्या गळ्यात टाकण्यात आली आहे. त्यानिमित्त गौलखेड ग्रामस्थांच्या वतीने त्यांना शाल पुष्पगुच्छ आणि भारताचे संविधान देवून गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरवातीला नवनिर्वाचित सरपंच लहू झालटे यांचेहस्ते डॉ.बाबासाहे आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण कारण्यात आला. त्यानंतर कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी ती तिवडी गावचे ग्रामस्थ आणि गौलखेड वासी मोठ्या प्रमाणावर हजर होते.



# वैज्ञानिक दृष्टिकोनच भारताला तारू शकतो : सुदर्शन निमकर

## ५१ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** तालुका स्तरीय '५१' व्या विज्ञान प्रदर्शनीचा उद्‌घाटन सोहळा आज सरस्वती विद्यालय वधोली दि.(७) ला पार पडला. भारतात विज्ञानाने केलेल्या प्रगतीमुळे जगभरात भारताची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. नुकतच चंद्रयान-३ देखील यशस्वी चाचणी पार पडली. ही खरी भारताची ओळख आहे विज्ञानाने केलेली प्रगती आहे.

जिद्द, चिकाटी, परिश्रमातून यशप्राप्ती निश्चितच होते विद्यार्थ्यांनी प्रयत्न करत राहावे असे प्रतिपादन उद्‌घाटन प्रसंगी माजी आमदार तथा सर्वोदय शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष सुदर्शन निमकर यव्यक्त केले. यावेळी जिल्हा परिषदच्या शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण, तालुका गट शिक्षण अधिकारीसमाधान भसारकर, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्ह्याध्यक्ष अध्यक्ष केशव ठाकरे, तालुका बाजार समिती संचालक सुहास माडूरवार, सरपंच राजेश कवठे, संचालक बाजारसमीती संदीप पौरकर, उपसरपंच शिला खरबनकर, माजी पंचायत समिती सदस्य संजय वडस्कर, तंटा मुक्ती अध्यक्ष अध्यक्ष संदीप लाटकर, शिवसेना तालुका प्रमुख सुरज माडूरवार, मुख्याद्यापक चोखारे यांची व तालुक्यातील अनेक विद्यार्थी शिक्षकांची उपस्थिती होती. प्रदर्शनात तालुक्यातील ५४ शाळांनी भाग घेतला.

यावेळी विद्यार्थ्यांनी समाजासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान,वर्षा सूचक यंत्र, जैविक शेती, प्रदूषण मुक्त शाळा, रामटेके तर आभार श्री शेडमांके यानी व्यक्त केले..

Contoura Vision
चष्मा नको ?
चष्मा घालवा कायमचा.
डॉ.कांकरिया यांचे
साई सूर्य नेत्रसेवा,अहमदनगर तर्फे
लेसर नेत्र शस्त्रक्रिया शिबीर
'कॉन्टूरा व्हिजन' जगातील सर्वात प्रगत तंत्रज्ञान

मोतीबिंदू ,काचबिंदू , तिरळेपणावर उपचार
दि.१९ नोव्हें.२३, हॉटेल रविराज,बाबा पेट्रोल पंपाजवळ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)-(सकाळी १० ते १२),
दि.२५ नोव्हे.२३, हॉटेल अन्विता, बीड (सकाळी १० ते १२),
दि.२५ नोव्हे.२३, हॉटेल पार्थ, लातूर (दुपारी ४ ते ६).
विशेष सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया केल्या जातील.
नोंदणी फिस रु.१००
9112288611
8888982222

# राज्याबाहेरील पणत्या स्थानिक कुंभार समाजाच्या मुळावर

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** महाराष्ट्रातील सुमारे ७० लाख लोकसंख्या असलेल्या कुंभार समाजातील लोकसंख्येपैकी जवळपास २० लाखापेक्षा अधिक लोक आजही आपली पारंपरिक पिढीजात कला जोपासून आपला उदरनिर्वाह करत आहेत. मातीचे माठ, रांजण, अक्षय तृतीयेचे कुंभ, विविध मूर्ती आणि दिवाळीच्या पणत्या बनवून त्यांच्या व्यवसायावर आपला प्रपंच चालवतात.मात्र बाहेरराज्यातून येणाऱ्या पणत्यामुळे स्थानिक कुंभार समाजातील व्यवसायिकांवर गदा आली असून, ईतर राज्यातून येणारा माल स्थानिकांच्या मुळावर बेतला असल्याचे अनेक व्यावसायिक बोलत आहेत.

रिसोड शहरातील बेंदरवाडी परिसरातील कुंभार समाजाची अनेक घरे आहेत.त्यापैकी अनेकजण आजही मातीच्या विविध वस्तू बनवून विक्री करण्याचा व्यवसाय करत आहेत. गणेश उत्सवात गणपतीच्या मूर्ती, नवरात्रात देवीच्या मूर्ती, मातीचे माठ,रांजण आदी हंगामानुसार वस्तू बनवून त्या विक्रिवरच सदर कारागिरांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. पूर्वीच्या काळात घरोघरी मातीच्या चुली आणि मातीची बरीच भांडी असायची त्यामूळे मातीच्या वस्तूंना खूप मागणी होती. परंतु आजच्या यांत्रिकी आधुनिक युगात माठाची जागा फ्रिज ने तर पणत्यांच्या जागी मेणबत्त्या आल्या असून, सर्वकाही रेडिमेड झाले आहे. परंतु आजही ग्रामीण भागात दिपावलीसाठी लागणाऱ्या मातीच्या पणत्यांना विशेष मान आहे. त्यामूळे सदर व्यवसायिक दिवाळीची मोठ्या आतुरतेने वाट पाहत असतो. पण बाहेरराज्यातून येणारा माल तिकडील मातीच्या गुणधर्मामुळे गुळगुळीत व चमकदार दिसत असल्याकारणाने स्थानिकांचा व्यवसाय मंदीत आला आहे. परिणामी आपल्या पिढीजात पारंपरिक कलेवर गुजराण करणाऱ्या कुंभार समाजातील अनेक कुटुंब आर्थिक अडचणीत सापडले आहेत. किंबहुना त्यांचा व्यवसायच संपुष्टात येण्याची भिती यानिमित्ताने व्यक्त केली जात आहे. बाराबलुतेदारापैकी एक मुख्य घटक असलेल्या कुंभार समाजावर उपासमारीची वेळ येऊ नये यासाठी शासनाने काहीतरी ठोस उपाययोजना राबवून फार पुर्वी पासून चालत आलेली कुंभार समाजाची कला परंपरागत पुढेही सुरूच राहावी यासाठी प्रयत्न करावे अशी अपेक्षा स्थानिक कुंभार समाजातील व्यवसायिकांनी व्यक्त केली आहे.





कोरोना काळात उध्वस्त झालेला आमचा व्यवसाय आजमितीस कसाबसा तग धरून आहे .मात्र मात्र बाहेरील राज्यातून येणाऱ्या मालामुळे आमच्या व्यवसायाला खीळ बसली आहे . पोळा, गौरी पूजन, गणपती आणि नवरात्रात पार निराशा पदरी पडली असून,आता दिवाळीतही काय होते, अशी चिंताग्रस्त अवस्था झाली आहे .
**लक्ष्मण डींडरकर ( कुंभार ), रिसोड**

# गटविकास अधिकाऱ्यांनी अपंग पाच टक्के निधी वाटपाचे काढले आदेश

## सामाजिक कार्यकर्ता दशरथ आंबेकर यांच्या पाठपुराव्याला यश

आधुनिक केसरी न्यूज

**किनवट :** अपंग प्रहार क्रांती संघटनेचे तालुका प्रसिध्दी प्रमुख तथा पत्रकार दशरथ आंबेकर ईरेगावकर आणि किनवट तालुका वंचित बहुजन आघाडीचे जेष्ठ कार्यकर्ते तथा पत्रकार विलास भालेराव यांनी अपंग पाच टक्के निधी वाटप ऐन दिवाळीच्या तोंडावर करुन अपंग,दिव्यांग महिला, पुरुष, युवक, युवती बांधवाची दिवाळी गोड व्हावी, यासाठी आज पंचायत समिती कार्यालय किनवट येथे जाऊन गटविकास अधिकारी वैष्णव यांना विनंती केली असताना  बिडिओ साहेबांनी अपंग, दिव्यांग पाच टक्के निधी प्रत्येक अपंगाच्या खात्यावर टाकण्याचे तातडीचे आदेश वरिष्ठ लिपिकास बोलावुन सर्व ग्राम विकास अधिकारी व ग्रामसेवकांना ग्रुपवर मेसेज पाठवला आहे. अपंग पाच टक्के निधीचे वितरण मेसेज पाठवण्यात आल्या नंतर लगेच दोन दिवसात वाटप करण्याचे नियोजन चालू झाले आहे. तरी अपंग, दिव्यांग बांधवांनी दिवाळी सणात गोडधोड पदार्थ खाऊन साजरी करण्यात यावी, असा मेसेज अपंगांना व दिव्यांग बांधवांना दिला आहे. वंचित बहुजन आघाडीचे जेष्ठ कार्यकर्ते तथा पत्रकार विलास भालेराव यांनी अपंग पाच टक्के निधी वाटप करण्यास सांगुन,गोरगरीब शेतमजूर, कष्टकरी,कामगारवर्ग, निराधार, वृद्ध,अपंग, दिव्यांग व्यक्तींना न्याय मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. यामुळे किनवट तालुक्यातुन अनेकांनी या दोघांचे अभिनंदन केले आहे.




# जिंतूर-सेलू तालुक्यात दुष्काळ जाहीर करा : मा.आ. विजयराव भांबळे

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** संपुर्ण मराठवाडा विभागात दुष्काळ जाहीर करणे व तसेच मागील वर्षाचे अतिवृष्टीचे अनुदान देणे बाबत आज आमदार रोहितदादा पवार साहेब यांच्या सोबत मा. आ. विजयराव भांबळे साहेब यांनी विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांना निवेदन सादर केले.

त्यात यावर्षी आपल्या मराठवाड्यात पावसाळा कमी प्रमाणात झालेला असल्याने जवळपास संपुर्ण मराठवाड्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती झालेली आहे. नागरिकांना पिण्याचे पाणी, जनावरांना चारा, पाणी, तसेच शेतीसाठी पाणी याची फार मोठी समस्या मराठवाड्यात निर्माण झालेली आहे. अशी वस्तुस्थिती असतांना देखील शासनाने मराठवाड्यातील फक्त काही तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केलेले आहे. संपुर्ण मराठवाड्यातील खरीप पिके पाण्याअभावी येऊ शकली नाही तसेच नद्या, धरणे, बंधारे यात पाणीसाठा नाही, सबब आपणास विनंती की, संपुर्ण मराठवाडा विभाग हा दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात यावा. तसेच मागील वर्षी मराठवाड्यात अतिवृष्टी झालेली होती



त्याबाबत शासनाने शेतकऱ्यांना हेक्टरी रुपये १३६००/- अनुदान ३ हेक्टरपर्यंत जाहीर केले होते परंतु अद्याप पर्यंतही संपुर्ण शेतकऱ्यांना सदर अनुदान प्राप्त झालेले नाही. तरी अनुदानापासून वंचित राहीलेल्या शेतकऱ्यांना अतिवृष्टीचे अनुदान त्वरीत देण्यात यावे. तसेच पिक विम्याची 100 टक्के अग्रीम रक्कम त्वरीत देण्यात यावी तसेच  मागीलवर्षीचा  पीक विमा त्वरित वाटप करण्यात यावा इ मागण्या करण्यात आल्या.

# येत्या मंगळवारी मंठ्यात रंगणार 'आविष्कार'चे कविसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**मंठा :** येथे येत्या मंगळवारी दिपावली पाडव्याच्या मुहूर्तावर रंगणार आविष्कार आयोजित काव्यमैफल.

आविष्कार साहित्य मंडळाच्या वतीने  "पौर्णिमा कवितेची" या शीर्षकांतर्गत दि.२९ ऑक्टोबर रोजी घेण्यात येणारे कविसंमेलन आरक्षण आंदोलनाच्या परिस्थितीचे गांभिर्य लक्षात घेऊन  पुढे ढकलण्यात आले होते. त्या कार्यक्रमाचे आयोजन येत्या मंगळवारी दि.१४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता करण्यात आले आहे.

मंठा येथे जि.प.प्रशालेच्या प्रांगणात होणाऱ्या कविसंमेलनात महाराष्ट्रातील नामवंत कवी हजेरी लावणार आहेत. याच सोहळ्यात काँग्रेसचे माजी आमदार धोंडीरामजी राठोड यांना मंडळाच्या वतीने 'आविष्कार जीवनगौरव' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. यावेळी कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून (उबाठा) शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे पाटील, तसेच भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष राजेश मोरे व प्रसिद्ध व्यापारी आनंदराम सोमाणी यांची विशेष उपस्थिती असणार आहे.

सायंकाळी ७ वाजता सुरू होणाऱ्या बहारदार कविसंमेलनात सुप्रसिद्ध कवी,गीतकार प्रकाश घोडके पुणे, टीव्ही स्टार हास्यसम्राट कवी गौतम गुळधे अमरावती, नितीन वरणकर शेगांव, कवयित्री अलका तालनकर अचलपूर, डॉ.प्रभाकर शेळके जालना, कवी प्रा.संजय कावरे अकोला आदी कवी हजेरी लावणार आहेत.

मंठा शहरातील व तालुक्यातील काव्यप्रेमी रसिकांनी या  कविसंमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आविष्कार साहित्य मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ. मनोज गाडेकर हे माझी बदनामी करत आहेत : संचालक सय्यद अजहर

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** शहरातील गणपती हॉस्पिटलमध्ये उपचार



करण्यासाठी पाथ्री येथील कलाबाई दादाराव धुमाळ यांच्यावर उपचार करण्यासाठी दाखल केले असता परंतु संबंधित डॉक्टरांनी वेळेवर उपचार न केल्याने त्या महिलेचा मृत्यू झाला. परंतु या संदर्भात फुलंब्री कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सय्यद अजहर यांनी हा मुद्दा उचलून धरल्याने गणपती हॉस्पिटल व गाडेकर हॉस्पिटल चे मालक मनोज अप्पासाहेब गाडेकर बदनामी करत असल्याने या विषयी तक्रार अर्ज औरंगाबाद विभागीय आयुक्त ,  औरंगाबाद जिल्हाधिकारी ,  औरंगाबाद जिल्हा पोलिस अधीक्षक , फुलंब्री तहसीलदार , फुलंब्री पोलीस निरीक्षक यांच्या कडे सादर करण्यात आले. या दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की,

दि. ६ नोव्हेंबर  २०२३ रोजी सकाळी १० वाजे दरम्यान गाडेकर हॉस्पिटल मध्ये कलाबाई दादाराव धुमाळ रा.पाथ्री ता.फुलंब्री या दाखल केलें होतें. तसेच डॉक्टर यांनी आम्हाला उपचार करतो असे सांगुन पेशंट ला I.C.U.त नेले व तिथं त्यांच्यावर काही उपचार न करता फक्तं त्यांना अडमित करुन घेतले. औषधी आण्यास सांगितले, व सम्पूर्ण तपासण्या कराव्या लागतील असे सांगितले.तुम्हीं पैसे जमा करा व त्या नंतर उपचार करतो असे सांगुन गेले. तसेच पैसे जमा नाही केले म्हणुन उपचार करण्यास टाळाटाळ केली.त्या नंतर त्यांना आम्हीं बील विचारले असता त्यांनी सांगितले की ३०००रू जमा करा व तुमचे पेशंट न्या.त्या शिवाय कोणीच इथ येऊ नये असे सांगितले. असे मला फोन द्वारे नातेवाईक यांनी माहिती दिली व मी डॉ मनोज गाडेकर यांना फोन वरून संपर्क साधला त्यात मी बाहेर असल्यामुळे मला थोडा उशीर झाला मी येऊन स्वतः परिस्थिती बघीतली तेंव्हा मी तात्काळ पोलिस यांना कळवले तसेच पोलिस अधिकारी व कर्मचारी तिथं आले.तेव्हा खूपच अवघड परिस्थिती व नातेवाईक यांचा संताप अनावर झाला होता.तसेच मला नातेवाईकांनी दिलेल्या माहिती नुसार मी माझ्या फेसबुक वरून व्हिडिओ टाकला. त्यात मी नातेवाईक व जनेतेच्या मनातील असलेले शब्द बोललो.त्या नंतर डॉक्टर असोशियान यांनी मला सांगितले की आम्हीं सम्पूर्ण हॉस्पीटल बंद केले आहे.आम्हीं एकाही नागरीक यांना तपासणार नाही. त्यात मला वाटले की माझ्या मुळे जनतेचे हाल होईल व हेळसांड होईल. मी एक लोकंप्रतिनिधी असल्या मुळे मला जनता आवश्यक आहे. त्या मुळे मी दिलगिरी व्यक्त केली. परत मनोज गाडेकर यांनी माझी बदनामी केली. मी जनतेचा नोकर आहे. परत नातेवाईक यांनी व गावातील नागरीक यांनी मला सांगितले की तूम्ही असं का करत आहे. आम्हाला न्याय पाहिजे आम्ही त्या हॉस्पिटलची तक्रार केली आहे तरी तूम्ही येथे या व व्हिडिओ टाका. तरी मी माझे काम प्रामाणिक करत आहे.पणं काल मनोज गाडेकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी माझ्यावर खोटं गून्हे दाखल करण्याचे निवेदन दिले आहे. मी एका गरीब कुटुंबावर झालेल्या अन्याय विरुद्ध आवाज उचलल्याने  मला विनाकारण टार्गेट,सीसीटीव्ही कॅमेरे ताब्यात घेऊन सत्य बाहेर आणावे मला योग्य न्याय द्यावा. जरी असे डॉक्टर माझ्यासारख्या लोकप्रतिनिधी इतके खोटा आरोप करत आहे तर सर्वसामान्य जनतेचे तर काय हाल करत असतील हा प्रश्न निर्माण झाला आहे.त्या मला मनोज गाडेकर यांनी जीव मारण्याच्या धमक्या दिल्या आहेत. वरील हॉस्पीटल व डॉक्टर यांची चौकशी करून त्या मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच फुलंब्री शहरात असलेल्या B.A.M.S असलेले यांना I.C.U. हार्ट अटॅक चे रुग्ण, ऑपरेशन करण्याचे अधिकार कोणी दिले तसेच शहरातील डॉक्टर यांच्या नावावर परवानगी असते व एम.बी.बी.एस. डॉक्टर नसता व B.A.M.S च उपचार करता व कोणत्याही डिग्री नसलेले स्टाफ नर्स पेशंट हाताळतात. त्यांना अनुभव आहे का सर्व प्रकारे सगळया हॉस्पीटल ची सीसीटीव्ही TV. त्यांचे परवाना रद्द करुन त्यांचे शिक्षण तपासण्यात यावे.  संपूर्ण चौकशी करण्यात यावी व त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा नसता लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल. असा इशारा फुलंब्री कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सय्यद अजहर यांनी दिला आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# घेता घेता देणाऱ्याचा वसा घ्यावा: शिक्षणाधिकारी शिंदे

## संवेदनशीलता जागा ठेवणारा दातृत्ववान सामाजिक उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर.**

**जिंतूर :** ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कवी विं. दा. करंदीकर यांच्या देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे. या कवितेचा दाखला देत शिक्षणाधिकारी गणेश शिंदे यांनी देणाऱ्याचा वसा आपण सर्वांनी घेतला पाहिजे असे संबोधित केले. संवेदनशील मनाने आणि उदारतावादी दातृत्व भावनेने शिक्षण विभाग जिंतूरने जमा केलेल्या सामाजिक निधी मधून हा स्तुत्य, अनुकरणीय उपक्रम संपन्न होत आहे. या कार्यक्रमात मला सहभाग घेता आला हे माझ्यासाठी अत्यंत भाग्याचे आहे. असे गौरवोद्गार आजच्या प्रसंगी गणेश शिंदे यांनी काढले. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय जिंतूर येथे "एक दिवाळी आनंदाची भेट देऊया स्नेहाची" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. "एक दिवाळी आनंदाची भेट देऊया स्नेहाची" या उपक्रमांतर्गत कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, जिंतूर आणि RMSA वस्तीगृहातल्या 235 बालिकांना दिवाळी सणानिमित्त "शिक्षण विभाग जिंतूरच्या" पुढाकारातून एक मनपसंत ड्रेस भेट देण्याचा सामाजिक संकल्प करण्यात आला. हा संकल्प पूर्ण करण्यासाठी जिंतूर तालुक्यातील सर्व शिक्षक, शिक्षण विभागात कार्यरत असणारे सर्व कर्मचारी तसेच सर्व क्षेत्रातून ऐच्छिक स्वरूपात निधी संकलित करण्यात आला. या संकलित निधीमधून सर्व मुलींना त्यांच्या पसंतीने ड्रेस खरेदी करुन आजच्या भरगच्च कार्यक्रमांमध्ये या मनपसंत ड्रेस आणि फराळाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष परभणीचे शिक्षणाधिकारी गणेश शिंदे हे होते प्रमुख उपस्थिती मध्ये जिंतुरचे तहसीलदार राजेश सरवदे, उपशिक्षणाधिकारी गजानन वाघमारे, गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले, शिक्षण विस्तार अधिकारी नवनित देशमुख, केंद्रप्रमुख शंकर भारशंकर सर, पांडुरंग भांबळे सर, देवानंद सावंत सर,दिनकर घुगे सर, गट साधन केंद्रातील वरिष्ठ सहाय्यक राजेंद्र ढाकणे सर, लक्ष्मण टाकणसार, लेखाधिकारी चंद्रकांत मानवते, शिक्षक संघटना प्रतिनिधी के.सी. घुगे, डी.जी.पोले, एस.यु. दांडगे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक करताना गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले यांनी मागच्या वर्षीपासून हा उपक्रम तालुक्यात राबविण्यात येत आहे. तत्कालीन जिल्हाधिकारी श्रीमती गोयल मॅडम यांच्या संकल्पनेतून मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी यांच्या प्रेरणेने तत्कालीन गटशिक्षणाधिकारी गणेश गांजरे यांनी या उपक्रमाची जिंतूर तालुक्यात मुहूर्तमेढ केली. या स्तुत्य आणि संवेदनशीलता जागा ठेवणारा दातृत्ववान सामाजिक उपक्रम याही वर्षी राबविण्याचे आम्ही ठरविले. या उपक्रमा पाठीमागील भूमिका, पार्श्वभूमी, रूपरेषा आणि आजचा प्रत्यक्ष यशस्वी कार्यक्रम संपन्न करण्यासाठी घ्यावी लागलेली मेहनत याविषयी सविस्तर माहिती सांगितली. या संपूर्ण कार्यात माझे सहकारी शिक्षण विस्तार अधिकारी सुभाष आमले, ज्ञानेश्वर साबळे, नवनीत देशमुख, कार्यालयीन कर्मचारी, सर्व केंद्रप्रमुख, सर्व शिक्षक संघटना पदाधिकारी, सर्व मुख्याध्यापक, सर्व शिक्षक यांच्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम होत आहे. हे ही सांगितले. प्रास्ताविकाचा शेवट करताना पोले यांनी सातत्याने सुरु असलेल्या प्रयत्नावर व कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील विद्यार्थिनीवर आधारित स्वरचित कविता सादर केल्या. उपशिक्षणाधिकारी गजानन वाघमारे यांनी या भरगच्च कार्यक्रमात विद्यार्थिनींना संबोधित करताना तुमच्यासाठी शिक्षण विभागाकडून जे प्रयत्न होत आहेत. ते प्रशंसनीय आहेत. येथे शिक्षण घेऊन आपल्या आयुष्यात यशस्वी झाल्यानंतर तुम्ही मुलींनीही या कार्यक्रमात सक्रिय सहभागी झाले पाहिजे. तरच हा सामाजिक उपक्रम अखंडपणे चालणार आहे. हा उपक्रम दरवर्षी यशस्वीपणे राबविण्यासाठी आम्ही जिल्हा कार्यालयाकडून सातत्याने प्रयत्नशील राहू. यासोबतच जिंतूर तालुक्यात दर्जेदार पोषण आणि गुणवत्ता पूर्ण शिक्षण यासाठी सुरू असणाऱ्या कार्याचे तोंडभरून कौतुक केले. नेहमीप्रमाणे आपल्या बहरदार काव्यात्मक शैलीमध्ये साहित्यिक मयूर जोशी यांनी सूत्रसंचालन करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. आपल्या भावस्पर्शी शैलीने प्रभाकर नालंदे यांनी सर्वांचे आभार मानले. एकंदरीत संपूर्ण कार्यक्रम उत्साहात, शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंचावरील उपस्थितांसोबत प्रधान, रवी राठोड, रवी मुंडे, राहुल उबाळे, देशमुख, नितीन पेठे, फड, सचिन चव्हाण, विकास सातभाई, श्रीमती राठोड, श्रीमती मुळे, श्रीमती अंभोरे, श्रीमती इंगोले, शिंदे, मनीष सावळे, पाटील, उंडे यासह सर्वांनी परिश्रम घेतले.





# खंडणीचा गुन्हा दाखल करण्याची डॉक्टर असोसिएशनची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** येथील खासगी हॉस्पीटलमध्ये सोमवारी (दि. सहा) उपचारादरम्यान एका महिलेचा मृत्यू झाला महिलेच्या नातेवाईक व इतरांनी रुग्णालयासमोरच गोंधळ घातला. लाकड आणून अंत्यविधी करण्याचा प्रयत्न केला. यामुळे येथे तनाव निर्माण झाला होता. याप्रकरणी खंडणीचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी डॉक्टर असोसिएनने पोलिसांना दिलेल्या निवेदनात केली आहे. मागणीचा विचार न झाल्यास रुग्णालये बेमुदत बंद ठेवण्यात येईल असा इशारा यात देण्यात आला आहे. कलाबाई दादाराव धुमाळ (रा. पाथी) असे मृत महिलेचे नाव आहे. डॉक्टर असोसिएनच्या निवेदनात म्हटले आहे की सयद अझहर या व्यक्तीने भाषणबाजी करून येथे गोंधळ निर्माण केला दुसऱ्या दिवशी मंगळवारी (दि. सात) झालेल्या गोंधळाबद्दल डॉक्टर असोसिएशनच्या सर्व डॉक्टरांसमोर माफी देखील माहितली. याचा व्हीडीओ सर्वत्र व्हायरल केला. बुधवारी (दि.आठ) मात्र त्याने पुन्हा डॉक्टरांच्या विरुद्ध हीडीओ सादर करून गुन्हा दाखल करण्याचा घाट घातला. यावर डॉक्टर असोसिएशन ने देखील या गोल पाया विरोधात फुलंब्री पोलीसांत फिर्याद दाखल केली आहे. यात गोंधळ घालणाऱ्या अजहर सय्यद यांनी पाच लाख रूपयाची खंडणी मागीतल्याची असोसिएशनने दिली आहे. डॉ. मनोज गाडेकर यांनी व्हीडीओद्वारे सदरील महिलेवर कोणत्या प्रकारचे उपचार केले हे सांगितले. केलेल्या उपचाराचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांना दाखवल महिलेचा बीपी लो होता त्यामुळे तत्काळ उपचार करण्याची गरज सांगितली परंतू नातलग थोड थांब आयसीयुमध्ये दाखल करू नका असे म्हणत होते. काही वेळानंतर महिलेक उपचार करण्यास सांगितले गेले. या बराच वेळ निघून गेल्याने महिलेच मृत्यू झाला असा डॉक्टरांचा दाव आहे. डॉक्टरांनी कोणतेही शुल्व घेतले नाही. फक्त मेडीकलचे पैसे हा असे सांगितले, यावर नातेवाईकान मृतदेह ताब्यात घेऊन रुग्णवाहिकेर ठेवला. याचवेळी अक्षर द शिवीगाळ केली व देश पुन्ह रुग्णालयात नेला. लाकड आणून रुग्णालयासमोर सरण रचले अस आरोप डॉक्टर असोसिएनने केल आहे. गुन्हा दाखल झाला नाही क येथेच अप्रि डाग देऊ असे म्हण डॉक्टरांना वेठीस धरले. दुसऱ्या दिवश माफी मागुन देखील अझर सम्यद डॉक्टरांच्या विरूद्ध पोलीसांना निवेदन दिल्याचे यात म्हटले आहे. याप डॉक्टर असोसिएशनने खंडणीचा गुन्ह दाखल करावा अशी फिर्याद दिल आहे. मंगळवारी डॉक्टरांनी दवाख तीन तास बंद ठेवले व सय्यद अझ याने माफी मागितल्यानंतर दवाखा सुरू केले. अक्षर याने पुन्ह डॉक्टरांच्या विरोधात भूमिका घेतली यामुळे बुधवारी सर्व डॉक्टरांनी बैठक होऊन पोलीसांना फिर्याद देण्यात आल खंडखोरावर तात्काळ गुन्हा दाखल करावा नसता सर्व दवाखाने बेमुदत बरं ठेवण्याचा इशारा देण्यात आला. या भूमिका काय असेल याक सर्वांचे लक्ष आहे. दरम्यान, रिपब्लीकन पार्टी ऑप इंडिया (डी) चे तालुकाध्यक्ष अज गंगावणे यांनी डॉ. मनोज गाडेकर यांच्या विरुद्ध फुलंब्री पोलिस तालुका आरोग्य अधिकारी यांन निवेदन देऊन गुन्हा दाखल करण्याच मागणी केली आहे.

# वन्य प्राण्यांच्या त्रासामुळे शेतकरी हतबल

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील खांडी पिंपळगाव येथे निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती व्यवसाय बिनभरवशाचाच झाला आहे. त्यात दररोज हरिण, रानडुक्कर, रोही ही कपाशी पिकाची प्रमाणात नासधूस करून भर घालत आहे. दिवसेंदिवस करांची संख्या वाढत असल्याने शेतकरी हतबल झाला आहे. येथील परिसरात अत्यल्प भूधारक गरीब शेतकयांच्या शेतातील कप पांच पांच रानडुकराच्या कल्पाकडून मोठ्या प्रमाणात नासाडी करण्यात येत जंगला लगतच्या नव्हे तर आता असून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान गावाला लागून असलेल्या शेतात सुद्धा होत आहे.

डोळ्यादेखत उमे पीक रानडुकराचा उपद्रव वाढला असून पायाखाली तुडविले जात असून वन्यजीवांचे कायदे अस्तित्वात असल्यामुळे त्यांना ठार मारण्यासाठी शेतकऱ्यांना कोणतीही परवानगी मिळत नसल्यामुळे या डुकरांच्या कळपाची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. परिणामतः या रानडुकराचा बंदोबस्त कसा करायचा या चिंतेत शेतकरी दिसून येत आहे. जंगलातील वन्य जीवांच्या राहण्याचे व खाण्यापिण्याची कोणतीही व्यवस्था वनविभागाकडून व शासनाकडून करण्यात येत नसल्यामुळे जंगलातून बाहेर पडून शेतकऱ्यांच्या उभ्य पिकावर तुटून पडतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातात कुठलेच पीक लागत नसून यात गरीब शेतकयांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. जंगलालगत नव्हे तर आता गावाला लागून असलेल्या शेतात सुध्दा रानडुक्कराचा उपद्रव वाढला असून हे पिकाचे नुकसान करीत आहेत. आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती हंगाम शेतकयांसाठी डोकेदुखी व जीवणा ठरत असताना त्यात रानडुकराचे फळ शेतकन्यांच्या अनेक परीसरातील कभ्या असलेल्या पिकावर डल्ला मारून उभ्या पिकांची न्य प्राणी नासधूस करून खराब करोत आहेत. अनेकवेळा या रानडुक्कर, रोही हरिण या सर्व वन्य प्राण्याचा बंदोबस्त करावा तसेच ना वन्य जीव प्राण्याना अभय अरण्य, खाणपाणची सोप करावी, असे नसल्याने, वन्य प्राणी शेतकन्यांची शेतातील पिकाची नासधूस करून खराब करीत या लवकर लवकर बंदोबस्त करावेत रमेश महालकर दिनेश महालकर आदींनी मागणी केली आहे.


गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in


# व्हिडिओ टाकणाऱ्या कार्यकर्त्यांनी मागितली माफी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरातील खासगी रुग्णालयात महिलेचे निधन झाल्याने एकाने सोशल मीडियावर व्हिडिओ टाकून डॉक्टरवर आरोप केले होते. त्याच कार्यकर्त्याने मंगळवारी सोशल मीडियावर डॉक्टरांची माफी मागितली. पाथ्री येथील महिलेचे उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना सोमवारी घडली होती. त्यानंतर एका कार्यकर्त्यांने सोशल मीडियावर संबंधित रुग्णालय व डॉक्टरांवर आरोप केले होते. मंगळवारी डॉक्टर असोसिएशन फुलंब्री यांनी पोलिस ठाणे गाठून सोशल मीडियावर व्हिडिओ टाकणारा कार्यकर्ता व नातेवाइकांनी चुकीच्या पद्धतीने बदनामी केल्याचा आरोप केला. त्यानंतरव्हिडिओ टाकणाऱ्या कार्यकर्त्याला बोलविण्यात आले. त्या कार्यकर्त्याची समजूत काढल्यानंतर त्यांनी पुन्हा सोशल मीडियावर येऊन काल झालेल्या गोंधळाबद्दल दिलगिरी व्यक्त केली